संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 3 | Issue : 7 | Marathi Monthly | Thane, 1 January 2026 to 31 January 2026 | Pages 16 | Price : 10/-

# कामगारांनी ‘कामगारधर्म’ जोपासून, आपलं आत्मभान जागं केलं; तर, शोषक-अन्यायी भांडवली व्यवस्थेला शरण येण्यावाचून गत्यंतर नाही!

## रोह्यातील कामगारांच्या बैठकीत, राजन राजे यांचे रोखठोक प्रतिपादन...



**रोहा (रायगड) :** कामगारांना आपली ताकद कळली पाहिजे... कारण, कामगार हाच खरा संपत्तीचा निर्माता आहे. कामगारांनी ‘कामगारधर्म’ पाळला, एकमेकांशी स्नेहभाव जोपासून आपलं आत्मभान जागं केलं; तर, प्रस्थापित रक्तपिपासू-निर्मम-शोषक भांडवली-व्यवस्थेला (Vampire-State System) शरण येण्यावाचून गत्यंतर राहणार नाही! असे रोखठोक प्रतिपादन ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष तथा ज्येष्ठ कामगार-नेते राजन राजे यांनी रायगड जिल्ह्यातील रोहा इथे केले. रविवार, दि. २८ डिसेंबर-२०२५ रोजी, रोहा तालुक्यातील धाटाव एमआयडीसीमधील, ‘डीआरटी अँथिया’ आणि ‘अंशुल इनोवेटिव्ह’ या कंपनीतील कामगार सभासदांच्या बैठकीत संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, केंद्र सरकारने ४४ कामगार कायद्यांच्या जागी ११ ने भाग धेऊन ४ काळे कामगार कायदे आणले आणि कामगारांच्या जगण्याचाच अवघा




‘भागाकार’ केलाय! त्याविरोधात आम्ही आवाज उठवतोय. महाराष्ट्रातील मराठी-तरुण मोठ्याप्रमाणात नासवला गेलाय... तो क्रिकेटच्या, धर्मसंप्रदायांच्या आणि संध्याकाळच्या बाटलीच्या नादाने...एका बाटलीने आमची शिवबा-संतांची मराठी-संस्कृती बाटली, ही दुर्दैवी अवस्था आहे! यापुढे आपण काय खाणार, कुठलं पाणी पिणार, कुठल्या हवेत श्वास घेणार, हे हाताच्या बोटावर मोजता येतील एवढे मोजकेच भांडवलदार ठरवणार आहेत. लोकशाही ही फक्त, आता मतांपुरती मर्यादित राहिलीय...आपल्या कामाच्या ठिकाणी लोकशाही असते का? तिथे तुमच्यावर सीसीटीव्हीचा वॉच असतो. आयुष्यातला सर्वात मोठा काळ आपण कारखान्यात घालवतो, याला कारण आपणच आहोत... कारण, आपण झोपलेलो आहोत. आपली कामगार संघटना ही, फक्त तुमचे पगार-बोनस याकरिता अजिबात नाही; तर, तुमची मानसिकता बदलण्यासाठी आणि तुम्हाला गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी आहे. भांडवलदारशाहीची कंत्राटी-कामगार पद्धत, तुम्हाला गुलामगिरीत ढकलण्यासाठी, चारही बाजूंनी पराकोटीचे प्रयत्न करत असते; पण, एकमेव ...पृष्ठ

---

अंतरंग




कामगारांचे कैवारी कॉम्रेड ॲड. के. आय. किल्लेदारांना अखेरचा लाल सलाम !!
....राजन राजे
(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)
पृष्ठ क्र. ८



‘एपस्टिन फाईल्स’च्या निमित्ताने....
....राजन राजे
(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)
पृष्ठ क्र. ११



मार्क्सवाद : एक स्वतंत्र आकलनाचा विषय
....राजन राजे
(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)
पृष्ठ क्र. १४

कर्तव्यपथावर हत्या झाल्यावर
मोहन देस
पृष्ठ क्र. १६

# भैय्ये आणि गुजराथी भांडवलदार यांच्यात, मराठी माणसाचं सॅन्डविच झालंय!

**मराठी शाळांच्या आंदोलनात, राजन राजे यांचे रोखठोक प्रतिपादन...**

मुंबई (प्रतिनिधी) : मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात, मराठी शाळा बंद करण्याचा सपाटा महाराष्ट्र शासनाने सुरु केला असून, मराठी शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्याचे कारण देत, मराठी शाळा बंद करुन, त्याठिकाणची जागा भांडवलदारांच्या घशात घालण्याचा मराठीद्रोही कट रचला जात आहे. याच पार्श्वभूमीवर भ्रष्ट पालिका प्रशासन, भुमाफिया आणि कणाहीन राजकारणी यांच्या अभद्र युतीविरोधात, मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष डॉ. दीपक पवार यांच्या नेतृत्वाखाली, मराठी शाळांसाठी दि. १८ डिसेंबर-२०२५ रोजी, हुतात्मा स्मारक ते मुंबई महानगरपालिका मुख्यालय अशा मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष तथा ज्येष्ठ कामगार-नेते राजन राजे, मुंबई विद्यापिठाचे माजी कुलगुरु भालचंद्र मुणगेकर, मराठी अभिनेत्री चिन्मयी सुमित, कम्युनिष्ट नेते प्रकाश रेड्डी, डाव्या चळवळीतील विचारवंत अजित अभ्यंकर, पत्रकार युवराज मोहिते, पर्यावरणवादी कार्यकर्त्या प्रणाली राऊत, कॉंग्रेसच्या रोजगार विभागाचे महाराष्ट्र अध्यक्ष धनंजय शिंदे, मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख, महाराष्ट्र संरक्षण संघटनेचे विवेक भुरके आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. याप्रसंगी मराठी शाळांसाठीच्या या मोर्चाला पोलिसांनी परवानगी नाकारुन दडपशाही सुरु केली. याचसंदर्भात प्रसिद्धीमाध्यमांशी



बोलताना राजन राजे म्हणाले, ''मराठी शाळांचे हे आंदोलन राजकीय नव्हे; तर, सामाजिक आहे. पोलिसांनी नियम व न्यायालयीन आदेश इतर राजकीय मंडळींनाही दाखवावेत, तेव्हा कुठे पोलिसांची दंडुकेशाही पेंड खायला जाते?'' असा थेट प्रश्न उपस्थित करुन ते पुढे म्हणाले, ''पोलीस-कर्मचारी जरी मराठी असले; तरी, बहुतांशी आयपीएस-आयएएस अधिकारी हे अमराठी असतात. त्यांच्याच आदेशावर खालचे लोक चालतात. पोलिसांच्या या फक्त काठ्याच नाहीत तर, भैय्यांच्या लाठ्या असून, खालच्या बाजूला परप्रांतीय भैय्ये आणि वरच्या बाजूला गुजराथी भांडवलदार यांच्यात मराठी माणसाचं सॅन्डविच झालेलं आहे... त्याच विरोधातला हा एल्गार आहे, तो रोखण्याचा प्रयत्न कशाला? काही हिंसक घडणार आहे का? असा सवाल विचारुन, रोखठोक प्रतिपादन केलं. दरम्यान, हुतात्मा स्मारक ते मुंबई महापालिका मुख्यालयापर्यंतच्या या मोर्चाला पोलिसांनी परवानगी नाकारल्यानंतर, काहीवेळ कार्यकर्ते व पोलिसांमध्ये वाद निर्माण झाला. मोर्चा मुंबई महापालिका मुख्यालयाजवळ पोहोचल्यावर, पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेत, आझाद मैदानात आणल्यावर मोर्चाचे रुपांतर सभेत झाले. यावेळी सर्व वक्त्यांनी मराठी शाळा वाचविण्यासाठी शेवटपर्यंत एकत्रितपणे संघर्ष करण्याचा निर्धार व्यक्त केला. या मोर्चाला 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष तथा ज्येष्ठ कामगार-नेते राजन राजे यांच्यासह, पक्षाचे प्रवक्ते समीर चव्हाण, सचिव नरेंद्र पंडित, प्रसिद्धीप्रमुख संजय दळवी, पक्षाचे माहिती अधिकार कक्षप्रमुख अनिल महाडिक, अविनाश सावंत, सचिन उगले आदी पदाधिकारी आणि 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे कामगार सदस्य उपस्थित होते.

# ...तर, शोषक-अन्यायी भांडवली व्यवस्थेला शरण येण्यावाचून गत्यंतर नाही!

...पृष्ठ क्र. १ वरुन

क्र. २ वर 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ' या आपल्या युनियनने ती प्राणपणाने मोडीत काढलीय. क्रिकेटचे सामने, सार्वजनिक महापूजा, गणेशोत्सव, भंडारे आणि निवडणुकांच्या काळात येणारा दारुचा पूर आणि मटणाच्या मेजवान्या यातून तुम्हाला आधी बाहेर पडावं लागेल... याच चंगळवादी गुलामी अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी आपली संघटना आहे. जर कामगारांनी एकजुटीने काम करणं नाकारलं; तर, मग सरकारने कुठलेही व कितीही काळे-कायदे आणले तरी, ही सगळी भांडवली-व्यवस्था कोलमडून पडेल...त्यासाठीच, कामगारांना आपली ताकद कळली पाहिजे! अशा शब्दांत राजन राजे यांनी, कामगारांमध्ये स्फुल्लिंग चेतवले. दरम्यान, रोह्याच्या धाटाव एमआयडीसीमधील, 'डीआरटी अँथिया' या बहुराष्ट्रीय रासायनिक कंपनीतील, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे सदस्य असलेल्या कामगारांना, कंपनी व्यवस्थापनाने तुटपुंज्या वेतनमानावर गेल्या अनेक वर्षांपासून झुलवत ठेवले आहे. त्यांना सन्मानजनक वेतन मिळावे, कामगारांचे हक्क मिळावेत यासाठी 'डीआरटी अँथिया'चे कामगार संघर्ष करीत असून, त्याच पार्श्वभूमीवर या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. माझ्या रोह्यातल्या कामगारांनी जर एकजूट दाखवली तर, कंपनी व्यवस्थापनाला शरण आणल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही. तुम्हाला बजावून ठेवतो, हा संघर्ष तुम्ही शंभर टक्के जिंकणार आहात... १५ हजारांच्या खाली एक रुपयाचीही पगारवाढ मी घेणार नाही आणि तीदेखील थेट पगारवाढ, सी.टी.सी. नव्हे...C.T.C. ही फक्त एकप्रकारची 'चहा पावडर' आहे, एवढंच आम्हाला माहिती आहे, त्याचा आमच्या पगाराशी संबंध नाही... तुमच्या आतले दिवे पेटले की, बाहेरच्या सूर्याची तुम्हाला गरजच भासणार नाही! अशा ज्वलंत वक्तव्यांनी राजन राजे यांनी, कामगारांना त्यांच्या अस्तित्वाची आणि ताकदीची जाणीव आपल्या भाषणाच्या शेवटी करुन दिली. याप्रसंगी 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे सचिव समीर चव्हाण, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा अध्यक्ष राजेश गडकर, पक्षाचे माहिती अधिकार कक्षप्रमुख अनिल महाडिक, प्रसिद्धीप्रमुख संजय दळवी या पदाधिकाऱ्यांसह, 'डीआरटी अँथिया'चे युनिट कमिटी अध्यक्ष प्रमोद जंगम, उपाध्यक्ष निखील वरणकर, सेक्रेटरी मयूर कोंडे, कार्यकारिणी सदस्य विनोद मगर, रामदास साखीळकर तसेच, कंपनीतील कामगार सभासद मोठ्यासंख्येने उपस्थित होते. यावेळी धाटाव एमआयडीसीमधील 'अंशुल इनोवेटिव्ह' या कंपनीच्या कामगार सदस्यांचीही लक्षणीय उपस्थिती होती.





# ...हो, तरीही आम्ही, डॉ. दीपक पवार-प्रणित 'मराठी अभ्यास केंद्रा'च्या १८ डिसेंबरच्या मोर्चात सहभागी झालो!

डॉ. दीपक पवारांना आमच्या पक्षाच्या नावाचं वावडं आहे; तर, त्यांच्या कार्यकर्त्यांना आमचंच वावडं आहे...हो, तरीही आम्ही, याहीपूर्वीही डॉ. दीपक पवारांना 'मराठीधर्म-कर्तव्य' म्हणून मनापासून साथ दिलेली आहे आणि १८ डिसेंबरच्या 'मराठी अभ्यास केंद्रा'तर्फे आयोजित मोर्चाला आम्ही त्यांच्या खांद्याला खांदा लाऊन साथ देणार दिलीय...

...कारण, एकच, **''निसर्ग आणि माणूस यांच्या शोषणाविरुद्ध, भ्रष्टाचाराविरुद्ध व मराठी-माणसांच्या हितासाठी जो कुणी खरा लढेल; त्या सत्कार्याच्या यज्ञयागात, चार समिधा आमच्याही पडाव्यात'', हेच आमचं धर्मकर्तव्य!**

...हीच, 'धर्मराज्य-प्रणित' आंतरीक तळमळ, प्रत्येक धर्मराज्य पक्ष-सभासदा ठायी असतेच आणि असलीच पाहिजे.

''महाराष्ट्र कसा असावा, 'गरीब की, श्रीमंत', 'विकसित की, अविकसित'', याची बिलकूल चिंता वा पर्वा न करता... ''शिवबा-संतांचा महाराष्ट्र, हा पूर्वीसारखाच 'निसर्गसंपन्न व शुद्ध हवापाण्या'चा हवा आणि त्यावर, न्याय्य-हक्क फक्त आणि फक्त, मराठ्यांचाच (जातिवाचक नव्हे; तर, 'भाषावाचक') हवा'', ही आमची पक्ष-स्थापनेपासूनच धारणा आहे...जसं जपानी कंपन्यांची धारणा, ''जमेल तेवढा नफा अथवा न जमल्यास होईल तेवढा तोटा...पण, 'गुणवत्ते'शी तडजोड न करता उत्पादन'', अशी असते; तद्वतच, **''जमल्यास 'श्रीमंत व विकसित'..न जमल्यास, 'गरीब व अविकसित' पण चालेल; पण, महाराष्ट्र हा, निसर्गसंपन्न व मराठ्यांचाच (मराठी-भाषिकांचाच) हवा'', हे आमचं ब्रीद आहे...यासाठीच, संयुक्त-महाराष्ट्रानंतर 'स्वायत्त-महाराष्ट्र'...राष्ट्रांतर्गत राष्ट्र, 'स्वायत्त-महाराष्ट्र', अशी निर्भेळ, निडर भूमिका घेणारा 'धर्मराज्य' एकमात्र राजकीय पक्ष आहे.**

'Zero-Tolerance towards Corruption and Exploitation of Man Nature'', या संदर्भीय विषयांबाबत 'धर्मराज्य पक्षा'ची, ही अशी निष्कलंक व ठाम 'सक्रिय' भूमिका असतानाही...त्याच विविध मुद्द्यांवर, स्वतंत्रपणे सामाजिक-चळवळी चालवणाऱ्यांना, जाहिरपणे 'धर्मराज्य पक्षा'चं साधं नाव घेण्याचीही इच्छा होऊ नये... हे 'धर्मराज्य पक्षा'चं नव्हे; तर, महाराष्ट्राचं दुर्दैव होय (उदा. दीपकजी, 'मराठीकरणा'च्या विषयक आपल्या भाषणात, त्यांना खरीखुरी साथ न देणाऱ्या राजकीय पक्षांविषयी बोलताना दिसतात; पण, छोटेखानी असला तरी, एक जाज्वल्य-जातिवंत राजकीय पक्ष, आपल्याला केव्हाचीच मोलाची साथ देतोय, हे सांगायला कायम विसरतातच...नाही म्हणायला, नुकतंच त्यांनी खास निमंत्रण-पत्र पाठवलंय, पण त्याचं स्वरुप खाजगीच)!

...याच संदर्भात, अन्य विषयांशी संबंधित अशा, काही समाजधुरिणांची नावं घेणं आज मी टाळतो; पण, या त्यांच्या नकारात्मक प्रतिसादात बदल कधि झालाच जर नाही; तर, ती प्रसंगोपात्त कधितरी घ्यावीच लागतील. कारण, ही सगळी मोठी माणसं, समाजासाठी (विशेषतः, मराठी-माणसांसाठी) स्वयंप्रेरणेनं प्रामाणिकपणे धडपडून काही करु पहातायत; म्हणूनच, या सगळ्याच महोदयांना व त्यांच्या संघटनाकार्याला वेळोवेळी खस्ता खाऊन व पदरमोड करुन, यथाशक्ती 'धर्मराज्य' संघटनेनं भरभरुन मदत केलेली आहे आणि त्यांच्या अनेकानेक उपक्रमात सक्रिय सहभाग घेताना, फार कष्ट उपसले आहेत...

### धर्मराज्य पक्षाची 'मराठीकरणा'विषयक भूमिका....

सर्वप्रथम, हा (एक प्रकारचा 'डिस्क्लेमर'च) जाहीर कबुली जबाब देतो की, आम्ही जरी मराठी-माध्यमातून शिकलो असलो तरीही...हो, आम्ही आमची मुलं 'इंग्लिश-मिडियम'मध्ये शिकवली; कारण, फिर फिर फिरुन व्यवस्थित-शिकण्याच्या आसपासच्या लायकीची, एकही 'मराठी-शाळा' ठाण्यात धड आढळली नाही, म्हणूनच केवळ! पण, त्या 'अपराधी-भावने'तून बाहेर पडत...आमच्या मुलांवर शक्यतेच्या पलिकडे जाऊन आम्ही मराठी भाषेचे, मराठी-वळणाचे, मराठी-संस्कृतीचे संस्कार, अत्यंत कष्टपूर्वक केलेले आहेत आणि 'मराठीकरणा'ला मजबूत करणारी, त्याची दृश्यरुपात फार चांगली फळं आम्हाला लाभली आहेत.

**''भाषा आणि संस्कृती अभिन्न अंग आहेत''... म्हणूनच, पर्शियातून आलेल्या पारशांना 'गुजराथी' भाषा सक्तिने अंगिकारावी लागल्यानंतर, आपसूकच ते 'कशाचाही विधिनिषेध न बाळगणारे 'व्यापारी' बनले (त्यात, पारशी 'टाटा घराणे'ही आलंच).**

...म्हणूनच, जो पूर्णतया 'मराठी-भाषा', घरात आणि व्यवहारात पूर्णतया स्विकारतो-अंगिकारतो; तो, मूळ कुठल्याही मातृभाषेचा असो, तो 'मराठा'च...नाहीतर, पिढ्यानपिढ्या महाराष्ट्रात राहून 'मराठी' त्याज्य समजणारे, इतर कुणीही 'मराठे' अजिबात नव्हेत (यात, घरीदारी मराठी बोलायला लाजणारे वा तिला नाकारणारे अथवा स्वार्थापोटी मराठ्यांचा 'विश्वासघात-अवसानघात' करणारे, जन्मजात 'मराठे' असले तरीदेखील त्यात आलेच)!

भांडवलदारांकडून कपर्दिकही देणगी न घेताच (ज्यात, "quid pro quo" असतोच) पक्ष चालला; तरच, तो 'मराठी माणसाचं आणि अर्थातच पर्यायाने मराठी-माणसा'चं चांगभलं करु शकेल...अन्यथा, अजिबात नव्हेच! ...म्हणूनच, **'मराठी माणसां'च्या नावाने काढलेले, वाढलेले आणि (आजही) चाललेले राजकीय पक्ष, या मुद्द्यावरच आजवर अपयशी ठरलेत आणि त्यांच्या अशा अटळपणे अपयशी ठरण्यानं (कारण, मुळातून त्यांचा पायाच 'भांडवल-पुरस्कार'प्राप्त असल्याने, निर्मितीपासूनच ठिसूळ, सदोष व अवसानघातकी होता) मराठी-माणूस तोंडघशी पडला आणि मराठी-भाषा, आपल्या मायभूमीतच 'धाराशायी' होऊ लागली... ती कधी इंग्रजीपुढे, तर कधी हिंदीपुढे आणि आताशी गुजराथीपुढे.**

...तरीही, हे सगळेच 'मराठी मराठी' करणारे पक्ष, आजही 'गुज्जू-भांडवलदारां'कडून वसूल केलेल्या पैशात फुकटात वह्यापुस्तकं, क्रिकेटचं-साहित्य वाटप करण्यात व हळदीकुंकू-नवरात्रौत्सव-भंडारे-सार्वजनिक पूजा/गणेशोत्सव-दहीहंड्या-क्रिकेटस्पर्धा यांच्या आयोजनातच रमलेले दिसतात; कारण पुन्हा तेच!

''युद्धात जिंकले आणि तहात हरले'', असे परंपरागत 'मराठे' आणि आजचे 'पाटील जरांगे' व्हायचं नसेल; तर, वरील कशाचाही 'मराठीकरणा'साठी काहीही उपयोग नाही; जोवर, देश आणि देशाच्या अर्थव्यवस्थेच्या नाड्या, आपल्या हातात करकचून ताणून ठेवलेल्या 'भांडवली-व्यवस्थे'ला तुम्ही आव्हान देत नाही!

...आणि, ते देण्यासाठी सकस 'मराठी-राजकीय मानसिकता' तयार करत नाही...मग, भले ती कुठल्याही पक्षाच्या 'बॅनर'खाली करा (हवंतरं, नवा पक्ष काढा... आमचाच 'धर्मराज्य पक्ष' मोठा करा, असं काही आमचं म्हणणं नाही; पण, भूमिका 'धर्मराज्य'चीच घ्यावी लागेल... इतर कुठलाही पर्याय नाहीच)!

### 'धर्मराज्य'च्या छत्रछायेत असंख्य कार्यकर्ते तयार झाले...

संघटनेत तयार होताना थोडीबहुत शिकलेली 'पोपटपंची' वापरत, अनेकजण कामगारवर्गाच्या (पर्यायाने, अर्थातच मराठी-माणसाच्या) पाठीत खंजीर खुपसणारे 'गद्दार' (आणि, अर्थातच मालामाल) बनले...काही भलेही निपजले; पण, त्यातले बरेच वैयक्तिक अहंगंडापोटी, आमच्याशी 'सवतासुभा' न मांडता; हकनाक वेगळी चूल मांडत 'माहिती-अधिकार वा सामाजिक-कार्यकर्ते' बनले...तर, काही संघटनेतच राहून ''संघटना जगेल, पण फार वाढणार नाही'' (जेणेकरुन, पक्षवाढीमुळे आपल्या वर्चस्वाला धोका निर्माण होऊ नये) याची 'दक्षता' घेऊ लागले.

...अशा विपरीत स्थितीतही जो पक्ष वाढीचीच काय पक्ष-अस्तित्वाचीही पर्वा न करता ''टोकदारपणे सर्वंकष मराठी-हिताची काळजी वाहू पहातो'', असा कोण आहे... या प्रश्नाचं उत्तर, ''जगी सर्वसुखी असा कोण आहे'', या समर्थ रामदासांच्या वैश्विक प्रश्नासारखं बिलकूल नकारात्मक नाही... त्याचं उत्तर, फक्त आणि फक्त, ''धर्मराज्य पक्ष'', हेच एकमेव आहे!

**'धर्मराज्य'ला किंवा 'धर्मराज्य'च्या भूमिकेला नाकारलंत आणि कदाचित प्रसिद्धीच्या मोहापायी आपल्याच 'सामाजिक-संस्थां'चे (त्यांची अजून 'संस्थानं' झाली नसली, तरीही) झेंडे फडकवत राहिलात; तर, येणारा काळ तुम्हाला माफ करणे नाही!**

...आज मराठीचा व मराठी-माणसाचा कोसळू पहाणारा डोलारा, तुम्ही कसाबसा सावरुन धरालंही...पण, उद्या नव्याने नव्या रुपात; या ना त्या मार्गाने, 'मराठी माणसं आणि मराठी भाषा' यावर संकटं कोसळतच रहाणार आहेत...तेव्हा, वेळीच सावधान, धन्यवाद!

**।। जय महाराष्ट्र, जय हिंद ।।**

**...राजन राजे** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

('धर्मराज्य पक्षा'तर्फे, मराठी-जनहितार्थ प्रसारित...)

# "Dash Down' From" "AIR TO GROUND"... DOWN DOWN WE COME, Both Indigo and NDA....

इंडिगोची इलेक्टोरल-बॉण्ड्सद्वारे (टेबलावरुन) तब्बल ३१ कोटींची भाजपला भरभक्कम देणगी (विरोधी पक्षांच्या पाचसहा पट)...टेबलाखालून किती, त्याची गणतीच नाही! वैमानिक व अन्य कर्मचाऱ्यांवरचा ताण कमी करणारी; पर्यायाने, विमान-प्रवाशांच्या सुरक्षिततेची काळजी घेणारी DGCAMr नवी-नियमावली गेल्यावर्षीच जाहीर व इंडिगोकडून अंमलबजावणीबाबत अतिरिक्त मुदतवाढीची मागणी...पायलट/क्रू-मेंबर्सची वाढवावी लागणारी संख्या व त्यातून घटणारा 'नफा' पाहून, पंधरा महिन्यांच्या गुन्हेगारी-विलंबानंतरही इंडिगोचा नवी-नियमावली अंमलबजावणीस कथित नकार... 'नवी-नियमावली' रद्द होत नसल्याचं पाहून प्रतिशोध म्हणून, (केंद्र-सरकारला मोठा निवडणूक-निधी दिलेला असल्याने 'गृहीत धरुन'), प्रवाशांना वेठीला धरत...इंडिगोच्या 'Blackmailing Tactics' बिनधास्त सुरुच असल्याचा कालपरवापर्यंत मोदी-सरकारचे अंधभक्त' असलेल्या संत्रस्त व संतप्त प्रवाशांचा उघड आरोप!

...अर्थातच, एवढे असे असंख्य संतापजनक व घृणास्पद घटनाक्रम अवतीभवती घडत असताना, ज्यांचे डोळे कधि उघडले नाहीत ते; स्वतःच्या पार्श्वभागाला चटके बसल्यावर तरी उघडतील का, हा यक्षप्रश्न असला...तरीही, ते जरी पूर्ण उघडले नाहीत, तरी 'किंचित किलकिले' होण्याची आशा मात्र बाळगायला हरकत नसावी!



एकूणात तात्पर्य : भाजप-संघीय NDA सरकारच्या काळ्या कारकिर्दीतील 'अंबानी-अदानी' टाईप 'MONOPOLY OR DUOPOLY'मुळे बेलगाम झालेली भांडवली-व्यवस्था, नफ्याच्या राक्षसी हव्यासापोटी कुठल्या थराला जाऊ शकते, हे गेल्या चार दिवसांच्या देशभरातल्या विविध विमानतळांच्या रंगमंचावर झालेल्या भांडवली-तमाशातून प्रतिकरुपाने दिसले...हाच रंगमंच, देशभरातल्या औद्योगिक व सेवा क्षेत्रात सर्वत्र विस्तारलेला आहे आणि वेळीवेळी जेव्हा जेव्हा कंपन्या-कारखान्यांतून असंख्य कामगारांचे क्रूरपणे जीव घेणारे रासायनिक विस्फोट होतात वा आग लागण्यासारखे अनेक अपघात होत रहातात...तेव्हा तेव्हा, प्रशासकीय-भ्रष्टाचाराच्या पडद्याआड, भांडवली-उत्पातातून घडलेली रौद्रभीषण नाट्ये, सहजी लपवता येतात आणि आता तर, कामगारांचं 'माणूसपण'च मुळातूनच नाकारणाऱ्या 'काळ्या कामगार-संहिता' व त्याअंतर्गत, राजमान्य झालेलं 'कंत्राटीकरण'... भाजप-संघीय सरकारकडून कामगारांवर लादलं गेल्यानंतर तर, नव्या कामगार-कायद्यांनुसार कंपन्यांतील कंत्राटी-कामगार, हे आता एकप्रकारे नोंदी नसलेले 'मि. इंडिया'सारखे 'अदृश्य' गुलाम असणार... अपघात झाला, कामगार मेले; तर, मेलेले कामगारच जर 'अदृश्य'; तर मग, नुकसानभरपाई द्यायची गरजच काय आणि ती द्यायची तरी कुणाला...???

लक्षात ठेवा, कामगार म्हणजे, सीमेवर लढायला गेलेले सैनिक नव्हेत, ते कंपन्या-कारखान्यांमधून उदरनिर्वाहाचं एक साधन म्हणून 'पोट भरायला आलेले' असतात... तेव्हा, बेसुमार नफे कमावण्यासाठी त्यांच्यावर अन्याय-अत्याचार कराल, त्यांचं जिवीत धोक्यात टाकाल...तर, खबरदार!

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष व धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ)



एका नवतरुण कवीचं, बालकवींसारखं केवळ विलोभनीय 'निसर्गकाव्य' नव्हे; तर, 'निसर्गप्रेमी-माणूस', या सध्याच्या भांडवली-व्यवस्थेतील व्यर्थ व उत्पाती मानवी-अहंकाराला जमिनीवर आणणारं आणि 'विकास नावाच्या विनाशा'वर 'मूले कुठारः' असा प्रहार करणारं काव्य आहे! पृथ्वीवरचा निसर्ग हाच खरा परमात्मा आणि ''माणूस, हा त्या 'परमात्म्याचाच अंश' म्हणजे, निसर्गाचाच अविभाज्य भाग असल्यानं, तो 'आपलाच प्रेमी म्हणजे, निसर्गप्रेमी' कसा असू शकेल आणि मग, तो 'निसर्ग-विध्वंसक'ही कसा? आणि, तसा तो किती काळ पृथ्वीवर जगू शकेल??''...याची, अतिशय प्रत्ययकारी व आसाला भिडणारी मांडणी, जेव्हा एवढा लहान वयाचा नवतरुण कवी करतो; तेव्हा तो, निसर्ग-पर्यावरणाला वेठीस धरुन मूठभर भांडवलदारांसाठी निर्घृणपणे ''ग्रेट निकोबार (अंदमान-निकोबार), हसदेव जंगल (छत्तीसगड), आरे कॉलनी (बुलेट-ट्रेन, मुंबई) वगैरे प्रकल्प व नाशिक-कुंभमेळा नावाचा 'दंभमेळा'; तसेच, त्या 'Crony-Capitalists' धनाढ्यांच्या खाणकामांसाठी 'माडवी हिडमा'सारख्या नक्षलवाद्यांच्या हत्या व शरणागतीचे सोहळे...यातून चालवलेल्या क्रौर्यपूर्ण व विनाशकारी बेलगाम वृक्षतोडीच्या घटनांवर व आधुनिक चंगळवादी जगण्यातल्या अंतर्विरोधावर नेमकेपणाने बोट ठेवतोय...म्हणूनच, त्याचं कौतुक व अप्रूप!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष...भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणस्नेही 'हरित-पक्ष'... The First "Green-Political Party' Of India)

# राजा व्यापारी; तर, प्रजा भिकारी!

देशातील श्रीमंत अधिकाधिक श्रीमंत होत आहेत; तर, गरीब अधिकाधिक गरीब होत आहेत... याची कारणे काय असावीत?

'शितावरुन भाताची परीक्षा' या न्यायाने एक उदाहरण बघू या...

आपले अदानी साहेब प्रचंड मेहनतीने श्रीमंत बनले आहेत, असे सांगितले जाते... पण, मेहनत कोणाची? तर, करदात्यांची. कशी? तर वाचा...

राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६वर केरळ राज्यातील अझियूर-वेंगलम रस्ता आहे. या रस्त्याचे कंत्राट आपल्या अदानी साहेबांना मिळाले. केवढ्याला? तर, १८३२ कोटी रुपयांना... पण, अदानी साहेबांनी काय केले? तर, त्यांनी तेच कंत्राट 'वागड इन्फ्रा प्रोजेक्ट, अहमदाबाद' या कंपनीला ९७१ कोटी रुपयांना सबलेट केले. अर्थात, एवढी प्रचंड ''मेहनत'' करुन (?) आपल्या अदानी साहेबांनी ९०० कोटींचा निव्वळ नफा मिळवला. याचा अर्थ असा की, तोच रस्ता ९७१ कोटी रुपयांना बांधून, वर नफासुद्धा कमावता आला असता. म्हणजे, रस्ता कमी खर्चात बांधून झाला असता, कमी टोल लावता आला असता... याचे कारण असे की, ९७१ कोटींना सबलेटेड कंत्राट घेऊनही, वागडसुद्धा नफा कमवणारच की!

तथापि, हेदेखील इतके साधे व सरळ नाहीये. या प्रकल्पाची किंमत आहे, १८३८ कोटी रुपये. त्यापैकी 'NHAI'ने ४०% 'ॲडवान्स पेमेंट' केले आहे. त्याची रक्कम आहे, अंदाजे ७३५ कोटी रुपये. उरलेले ६०% म्हणजे, ११०० कोटी रुपये नंतर मिळणार. याचा अर्थ असा की, आपल्या अदानी साहेबांना किती गुंतवणूक करावी लागली? तर, फक्त २३५ कोटींची... कारण, ७३५ कोटी रुपये तर 'ॲडवान्स पेमेट' म्हणून आगाऊच मिळाले आहेत. याशिवाय यावर व्याज वगैरे मिळाले असेल, ते वेगळेच. उगाच नाही मोठमोठ्या प्रोजेक्ट्सची घोषणा होत... आणि, आम्ही विचार करीत बसतो की, हिंदुत्ववादी सरकार असूनही, गरीब-बिच्चारे हिंदू अधिक गरीब का होत आहेत...???

***....सूरज सामंत***

# घर हक्क परिषदेची बैठक संपन्न




गिरणी कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी, परवडणाऱ्या दरात हक्काची घरे मिळावीत यासाठी, त्याचीच माहिती देण्यासाठी 'घर हक्क परिषदे'च्या वतीने, दि. १७ नोव्हेंबर–२०२५ रोजी, गांधी भवन (कुलाबा, मुंबई) येथे, एक पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषदेत 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष तथा ज्येष्ठ कामगार नेते मा. राजन राजे, काँग्रेसच्या अर्थशास्त्र विभागाचे अध्यक्ष मा. विश्वास उटगी, सर्व श्रमिक संघाचे नेते कॉ. शिशिर ढवळे आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, संविधानातील अधिकारानुसार जमिनीची मालकी ही, जनतेची असते. याच अनुषंगाने, सर्व बंद कारखान्यांच्या जमिनी, त्या कारखान्यांत काम करणारे कामगार व सर्वसामान्य जनतेच्याच असल्याने, त्या जमिनींवर गिरणी कामगार व जनतेसाठी परवडणारी घरे बांधावीत, अशी मागणी पत्रकार परिषदेत करुन, दि. १ ऑगस्ट–२०१९ रोजीचा जीआर रद्द करण्यात यावा, अशी मागणी, करण्यात येणार असल्याचे मा. विश्वास उटगी यांनी सांगितले. आमच्या जमिनीवर, आमच्या घराचा हक्क या घोषणेनुसारच, यापुढे 'घर हक्क परिषद' आपला लढा सुरु ठेवणार असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. याच पार्श्वभूमीवर, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, उप-मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे व श्री. अजित पवार आणि संबंधित मंत्र्यांना, त्या माध्यमातून मागणी करण्यात आली आहे. तसेच, गिरणी कामगार व लोकांमध्ये याबाबत जनजागृती होण्यासाठी मुंबईसह, महाराष्ट्रातील महत्त्वाच्या शहरांमध्ये सार्वजनिक सभा आयोजित करण्यात येतील, अशी माहिती मा. विश्वास उटगी यांनी, यावेळी पत्रकार परिषदेत दिली.

गिरणी कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी, परवडणाऱ्या दरात हक्काची घरे मिळावीत यासाठी 'घर हक्क परिषदे'च्या वतीने, मोर्चेबांधणी सुरु झालेली असून, त्याच पार्श्वभूमीवर शनिवार, दि. १५ नोव्हेंबर–२०२५ रोजी, 'राष्ट्रीय मिल मजदूर संघा'च्या परळ-भोईवाडा येथील कार्यालयात एक महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे, काँग्रेसच्या अर्थशास्त्र विभागाचे अध्यक्ष श्री. विश्वास उटगी, राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे कार्याध्यक्ष श्री. गोविंदराव मोहिते, काँग्रेसचे श्री. गजानन देसाई, श्री. मोहन तिवारी, श्रीमती छाया थोरात, डाव्या पक्षांचे नेते कॉ. शिशिर ढवळे, कॉ. सुकुमार दामले, श्री. विजय कुलकर्णी, रेमण्ड कामगार संघर्ष समितीचे श्री. अनिल महाडिक आणि 'धर्मराज्य पक्षा'चे प्रवक्ते श्री. समीर चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, उप-मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे व श्री. अजित पवार आणि संबंधित मंत्र्यांना, निवेदन देण्याचे बैठकीत ठरले असून, गिरणी कामगार व लोकांमध्ये याबाबत जनजागृती होण्यासाठी मुंबईसह, महाराष्ट्रातील महत्त्वाच्या शहरांमध्ये सार्वजनिक सभा आयोजित करण्यात येतील, असे या बैठकीत सर्वानुमते ठरविण्यात आले.

*(सुल्झर पंप्स इं., दिघा नवी मुंबई...एक अशी कंपनी, ज्या कंपनीच्या 'सेऊ' कामगार-संघटनेनं अवघ्या कामगार-चळवळीला नवी क्रांतिकारी दिशा दिली... पण, १ नोव्हेंबर-२०२०, या दिवशी व्यवस्थापनाची दलाली व बूटचाटेगिरी करणाऱ्या, एका 'अल्पसंख्य' गटाने, निवडणूक घेतल्याची 'बतावणी' करत (खरंतर, अगा जे कधि घडलेचि नाही, अशा बनवाबनवीची निवडणूक) गद्दारी केली आणि समस्त कामगार-चळवळीचा आधारस्तंभ असलेल्या संघटनेच्या गळ्याला नख लावण्याचं महापातक केलं...या पार्श्वभूमीवर, 'सेऊ'चा 'कामगार-कवी' निरंजन म्हात्रे या कामगाराने रचलेली प्रत्ययकारी कविता...)*

::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::

***(हाच तो दिवस...हा! हन्त! हन्त!! हन्त!!!)***

*दिसत होता प्रकाश नव्याने सगळ्यांसाठी,*
*गद्दरीचे चाळ बांधून पायी, वाट लावली आपल्याच लोकांनी...*
*ऐक्य या अखंडित संघटनेचे बाटले विषारी विचाराने,*
*कारण, इथे जन्म घेतला स्वार्थासाठी एका क्षुद्राने.*
*कधी वाटते प्रकाशापेक्षा अंधारच बरा...कारण,*
*लख्ख उजेडातही दिसला नाही चेहरा विकृतीने ग्रासलेला...*
*लाचारी तुमचा धर्म असावा, गुलामगिरी, गद्दारीशी तुमची प्रीत,*
*सांगण्यासाठी आवाज मोठा, आम्ही नाही कोणासही भीत....*
*गद्दार दिनाच्या, खास गद्दारांना हार्दिक शुभेच्छा....*

**...कवी : निरंजन म्हात्रे**

# मर्सिडिज-बेंझचा अभ्यासवर्ग...

हुरुन इंडिया वेल्थ अहवाल दरवर्षी प्रसिद्ध होतो. वाढत असलेल्या आर्थिक विषमतेबद्दल त्यामध्ये बरीच उपयोगी आकडेवारी असते. मीदेखील त्याची आकडेवारी माझ्या 'सोशल मीडिया पोस्ट'साठी वापरत असतो.

यावर्षी या अहवालाला, मर्सिडिज-बेंझ अहवाल म्हटले गेले आहे, असे बातमीत वाचून मी चमकलो... म्हटलं, या बहुराष्ट्रीय कंपनीला भारतातील वाढत्या आर्थिक विषमतेबद्दल अचानक हृदयात कळ आली की काय? मनात आले, कदाचित त्यांच्या सीएसआर फंडिंगमधील एक ॲक्टिव्हिटी असेल. मन मानायला तयार नव्हते; कारण, ही लई पोचलेली लोकं आहेत. आर्थिक विषमता वगैरे शब्दांमुळे त्यांची हृदये कणभरदेखील द्रवत नसतात!

**ड आय वॉज करेक्ट!**

४६ लाख रुपयांपासून ७८ लाख रुपयांपर्यंत प्राईस रेंज असणाऱ्या मर्सिडीज कंपनीला, आपले ग्राहक कोण? याची स्पष्टता आहे. हे ग्राहक देशातील अब्जाधीशच असणार, पगारदार मध्यमवर्गीय नसणार, हे या कंपनीला चांगले माहित आहे. मर्सिडिजने दिलेले पैसे वापरुन, हुरुन अहवालाने ही आकडेवारी गोळा केली आहे. भारतात एक मिलियन डॉलर्स म्हणजे, अंदाजे N८.५ कोटी एवढी संपत्ती असलेल्या कुटुंबांची संख्या वाढून ८,७१,००० झाली आहे. 'मर्सिडीज बेंझ'ला फक्त आकडेवारीत रस नाहीये. तिला इंटरेस्ट आहे की, हे अब्जाधीश नक्की कुठे राहतात? अहवालाने त्याचादेखील शोध घेतला आहे. अशी शहरे आणि राज्यनिहाय माहितीदेखील अहवालाने दिली आहे.

वरीलपैकी १.७८ लाख अब्जाधीश कुटुंबे महाराष्ट्रात आहेत, त्यापैकी एकट्या मुंबईत १.४२ लाख कुटुंबे राहतात. दिल्लीमध्ये ८०,००० तर, तामिळनाडूमध्ये ७३,००० आणि कर्नाटकात ६९,००० अब्जाधीश कुटुंबे आहेत. उघड आहे, या आकडेवारीचा उपयोग करुन, 'मर्सिडीज' त्यांच्या शोरुम कुठे उघडायच्या, मार्केटिंगसाठी खर्च कुठे करायचे, हे ठरवणार आहे.

अहवाल प्रकाशित करण्याच्या समारंभात 'मर्सिडीज-इंडिया'चे सीईओ संतोष अय्यर म्हणालेदेखील; की, देशात अब्जाधीशांची संख्या वाढत आहे, ही कंपनीसाठी चांगली बातमी आहे! ते पुढे हेदेखील म्हणाले की, पुढच्या दहा वर्षांत आजचे अनेक अब्जाधीश वयस्कर होऊन रिटायर्ड होतील किंवा निसर्ग नियमानुसार जिवंत राहणार नाहीत, त्यावेळी त्यांची संपत्ती त्यांच्या पुढच्या पिढ्यांकडे हस्तांतरित होणार आहे. अब्जाधीश कुटुंबातील या पुढच्या पिढीवर आमचा डोळा असणार आहे; कारण, ते 'मर्सिडीज' कारचे ग्राहक असणार आहेत! या घटनेकडे 'मर्सिडीज' आणि/किंवा संतोष अय्यर असे व्यक्तिगत बघू नका. 'सिस्टिम' (प्रणाली) किती बारकाव्यात जाऊन काम करते? याचे उदाहरण म्हणून याकडे बघा... दहा वर्षांनी, आपली 'परिवर्तनवादी-चळवळ' कुठे असेल, याचा आपण विचार केलाय का?

***....संजीव चांदोरकर***

# संजीव चांदोरकरी... 'Again At One Of It's Best'!

**संजीव चांदोरकर (जे व्यक्तिशः माझे निकटचे स्नेही आहेत), हे प्रख्यात डावे–विचारवंत, त्यांच्या खालील 'चांदोरकरी'त म्हणतायत त्याप्रमाणे, अंतिमतः भयंकर घातकी अशा भांडवली–व्यवस्थेवर डाव्यांनी वेळोवेळी केलेल्या रास्त टिकेला जनमानसात फारसे 'ट्रॅक्शन' मिळत नाही.**

...सांगायची गोष्ट ही की, ''अमूर्त गोष्टींचे (वैचारिक–मांडणी) आकलन होण्यासाठी, मूर्त घटना घडाव्या लागतात''... अशी यथार्थ तक्रारवजा व्यथा संजीवजी मांडतात; तेव्हा पुढचं हे सांगणं क्रमप्राप्त ठरतं की, डाव्यांना समाजात 'ट्रॅक्शन' तेव्हाच आणि तेवढ्यापुरतंच मिळतं; जेव्हा, त्या व्यक्तिचे स्वतःचे किंवा त्या विशिष्ट समाजघटकाचे (उदा. एखाद्या कंपनीतील कामगारांचा वा विशिष्ट प्रकल्पबाधितांचा प्रश्न वा संघर्ष) अवघं जगणंच उध्वस्त करु पहाणारे प्रश्न, त्यांच्यासमोर उभे ठाकतात... पण, त्याचं ''निवडणुकीच्या मतात रुपांतरण होत नाही'', परिणामतः विविध राजकीय, आर्थिक व नैसर्गिक (उदा. कार्बन प्रदूषणाने झालेली जागतिक–तापमानवाढ व त्यातून उद्भवणाऱ्या असंख्य आनुषंगिक समस्या वगैरे) 'समस्यांची मांदियाळी', या ना त्या प्रकारे चारही दिशांनी उभी रहात जाते...त्याचं कारण, संजीवजी म्हणतात त्याप्रमाणे 'आर्थिक–निरक्षरता' हे तर आहेच; पण, जोडीला राजकीय–निरक्षरता अथवा राजकीय बेपर्वाई वा आत्मस्वार्थप्रेरित राजकीय–लघुदृष्टीही आहे!

...या 'चांदोरकरी'त मांडणी झालीय; त्यानुसार, कंपन्यांच्या महाकाय आकारामुळे त्यांच्या हाती येणाऱ्या आर्थिक, राजकीय सत्तेचा त्यांना भयंकर माज आहेच; पण त्याशिवाय, ही अनिर्बंध सत्ता म्हणजे, सर्वसामान्यांच्या जगण्याशी लावलेला नृशंस भांडवली सट्टा आणि त्यांच्या जगण्याची हरघडी होणारी क्रूर थट्टादेखील आहे!

...त्यांनी महाकाय कॉर्पोरेट्सविषयक म्हटलेलं ''टू बिग टू फॉल'', हे एकतर भांडवली–व्यवस्थेचं समाजाला जडलेलं 'व्यसन' आहे किंवा ते त्यांचं 'रोजमर्रा की जिंदगी'चं (Everyday life) अडलेलं घोडं आहे!

**...इंडिगो'बाबत कॉम्प्रोमाइज काय झाले? प्रवाशांची सुरक्षितता; असं संजीवजी नमूद करतात. ती भयप्रद वस्तुस्थिती, अहमदाबादमधील भीषण विमान–अपघातात दिसून आलीच...आणि मग, सतत तंत्रज्ञानयुक्त गुंतागुंतीच्या व अत्यंत धोकादायक परिस्थितीच्या ताणतणावाखाली काम करणाऱ्या पायलटलाच दोषी धरुन व्यवस्थेनं हात झटकून मोकळं व्हायचं?**

... ''रेग्युलेटरी कॅप्चर'' या अत्यंत महत्त्वपूर्ण संज्ञेचा, ही 'चांदोरकरी' धांडोळा घेत असताना माजी सेबी–प्रमुख 'माधवी पुरी बुच–अदानी', प्रकरणाचं आपल्याला स्मरण करुन देते (खरंतर, आपण एवढे भाबडे असतो की, महिला उच्चशिक्षण घेऊन मोठ्या पदांवर स्थानापन्न झाल्या की, भ्रष्टाचार कमी होईल, असं आपल्याला वाटत रहातं). **या 'रेग्युलेटरी कॅप्चर'सारख्या भांडवली–व्यवस्थेतल्या दगलबाजीने, एकूणच जनहिताच्या दृष्टीकोनातून विचार करता, एवढी खालची पायरी धोकादायकरित्या ओलांडलीय की, रिलायन्स, अदानीसारख्या सरकारी–यंत्रणेच्या अवैधानिक आशिर्वादाने मोठ्या झालेल्या व अजूनही 'कोटीच्या कोटी उड्डाणे' घेणाऱ्या महाकाय कंपन्या...या देशाचा पंतप्रधान कोण होणार व तो कुठवर आणि कितीकाळ त्या पदावर रहाणार, हे बंद आलिशान केबिनमध्ये बसून ठरवू लागल्यात... नरेंद्र मोदी, हे 'प्रॉडक्ट' कुणाचं? शेतकऱ्यांना नाडणाऱ्या आणि कामगारांना पिळणाऱ्या 'काळ्या कायद्यां'ची पैदास नेमकी होते कुठून??**

...पंतप्रधानपदावर बसल्यापासून मोदी जे लाखालाखाचे सतत बदलले जाणारे सूट परिधान करतायत व इतर कमालीच्या महागड्या वस्तू बाळगतायत किंवा वापरतायत, त्या वस्तू बनवणाऱ्या बड्या 'ब्रँडेड' कंपन्या...आता, जगभरात फक्त वस्तुंचाच नव्हे; तर, राष्ट्रप्रमुखांचा, शासन चालवणाऱ्यांचाही 'ब्रॅण्ड' ठरवायला लागल्यात!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# इंडिगो : गाभ्यातील इश्यू.....

लाखो विमान प्रवाशांना, त्यांनी ठरवलेल्या कार्यक्रमाप्रमाणे, इच्छितस्थळी पोहोचवणे, त्यात बाधा येऊ न देणे आणि, त्याच विमान प्रवाशांची सुरक्षितता...या दोघांमध्ये एकाची निवड करण्यास इंडिगोने DGCA ला भाग पाडले.

....आणि, DGCA ने सुरक्षितता, हा निकष काही काळासाठी पुढे ढकलून देशातील हवाई वाहतूक लवकरात लवकर सुरळीत होण्यासाठी 'इंडिगो'पुढे लोटांगण घातले!

फक्त, इंडिगो नाही; तर, कोणत्याही उद्योगातील महाकाय 'मक्तेदार कंपनी' (Monopolistic Corporation) हेच करणार आहे. म्हणून हा इश्यू इंडिगो प्रकरणात काय झाले, याच्यापलिकडचा आहे आणि असला पाहिजे.

**'मक्तेदार–भांडवलशाही' (मोनोपोली–कॅपिटलिझम) नक्की कसे काम करते, ही प्रणाली निखळ स्पर्धेवर आधारित उत्पादक औद्योगिक–भांडवलशाहीपेक्षा देशासाठी, अर्थव्यवस्थेसाठी जास्त घातक का आहे, ती 'जनहित'विरोधी का आहे.याबद्दलची टीका जगभर डावे–विचारवंत अनेक वर्षे करत आलेले आहेत. पण, त्यांच्या टीकेला जनमानसात फारसे 'ट्रॅक्शन' मिळत नाही...कारण, 'अर्थ–निरक्षरता'!**

पण, अशा वैचारिक मांडणीच्या अंगभूत मर्यादा आहेत. कारण, अशा अमूर्त गोष्टींचे आकलन होण्यासाठी, मूर्त घटना घडाव्या लागतात... मागच्या आठवड्यातील इंडिगो घटना, ही अशी एक घटना आहे.

मक्तेदार–कंपन्या म्हणजे काय? या कंपन्या त्या त्या उद्योगात मार्केटचा खूप मोठा हिस्सा खिशात घालून फिरतात. उदा. भारतातील एकूण हवाई प्रवासी वाहतुकीचा दोन तृतीयांश हिस्सा इंडिगोकडे आहे...किंवा, इंडिगो देशातील अनेक हवाई मार्गांवर एकमेव विमानसेवा आहे इत्यादी.

**''महाकाय आकारामुळे आर्थिक सत्ता...आर्थिक सत्तेतून राजकीय सत्ता...राजकीय सत्तेतून धोरण–सत्ता'', अशी ती शृंखला आहे. खोके, पेट्या हे त्याचं 'माध्यम' आहे. पण, हे एखाद्या सरकारी अधिकाऱ्याला चिरीमिरी देणे नव्हे; ते एकवेळ परवडले, म्हणण्याची वेळ आज आपल्यावर आलीय...कारण मक्तेदार–कंपन्या संपूर्ण देशासाठीची आर्थिक–धोरणे, काही पिढ्यांसाठी प्रभावित करु शकतात...आणि, हे फारच 'डेंजरस' आहे!**

बँकिंग, वित्तीय क्षेत्रात 'Too Big To Fall', अशी एक टर्म आहे. त्याचा अर्थ समजून घेतला, तर इथे उपयोग होईल.

आयसीआयसीआय किंवा एचडीएफसी या बँका, खाजगी बँका आहेत. समजा थकीत कर्जे प्रमाणाबाहेर वाढल्यामुळे वा काही कारणाने त्यांचे काही बरेवाईट झाले. तर त्या बँकेतील ठेवीदार, गुंतवणूकदार, कर्मचारी, अधिकारी यांचे गंभीर नुकसान होईल...मान्य. पण, वरील दोनपैकी एक जरी बँक, काही दिवस जरी बंद पडली; तरी, देशाच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेवर गंभीर विपरीत परिणाम होऊ शकतो. दुसऱ्या शब्दात, त्या बंद पडू न देणे हे राष्ट्राच्या, अर्थव्यवस्थेच्या हिताचे बनत जाते...यालाच ''टू बिग टू फॉल'' म्हणतात.

देशाची, अर्थव्यवस्थेची एक्झॅक्टली हीच दुखरी नस, इंडिगोसारख्या मक्तेदार–कंपनीला माहित होती.

DGC– ने पायलट संबंधात नियम जाहीर केल्यानंतर त्यांची अंमलबजावणी केली की, आपले खर्च वाढून नफा आणि शेयर प्राईस कमी होणार...हे कंपनीला माहीत होते. म्हणूनच, इंडिगोने ते १८ ते २४ महिने बेदखल केले. क्रायसिस–पॉईंट आलाच तर, DGCA ला आपण आपल्या टर्म्सवर नियमात बदल करण्यास भाग पाडू शकतो, हा फाजील आत्मविश्वासही कंपनीला होता...आणि, मागच्या आठवड्यात तसेच झाले.

हे 'हायपोथेटिकल' नाही. कंपनीच्या अंतर्गत कागदपत्रांवरुन दिसते की, ''पुढच्या काही महिन्यात खूप मोठी पायलट, नोकरभरती केली नाही तर कंपनीच्या कारभारावर विपरीत परिणाम होईल'', असा इशारा उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना दिला गेला होता. पण, त्यावर काहीही कृती केली गेली नाही.

**कल्पना करा. आपल्या नियमाप्रमाणेच इंडिगोने कारभार करावा म्हणून DGCA ने बडगा उगारला असता; तर, विमान उड्डाणांची संख्या मोठ्या प्रमाणावर कमी झाली असती आणि देशातील हवाई वाहतूक कोलमडली असती...आत काय कॉम्प्रमाईज झाले? ते झाले, प्रवाशांची सुरक्षिततेबाबतीत**

**काहीजण DGCA ला दोषी धरतात. DGCA एका ऑरगॅनिक शासन यंत्रणेचा, अनेक अवयवांपैकी एक, अवयव आहे हे लक्षात घेतले की, बरेच अर्थ लागतील...यालाच ''रेग्युलेटरी कॅप्चर'' असे म्हणतात! हवाई क्षेत्रातील मक्तेदार कंपनी...हवाई खात्याचा मंत्री कोण असणार, सचिव,** ...पृष्ठ क्र. ७ वर

"Show me the man, I'll show you the crime" a cynical phrase, in stark contrast to legal principles like nullum crimen sine lege (no crime without law)...was allegedly used by Lavrentiy Pavlovich Beria, influential Joseph Stalin's secret police chief, serving as head of the NKVD from 1938 to 1945.

Looking at the series of unfolding events, as mentioned below, which have been circulating widely in the social-media...one may tend to infer that the same cynical and clinical way, Narendra Modi-Amit Shah duo BJP (NDA) Government might have proposed to Mr. Gautam Adani, after attaining power in 2014, "Show us the company (or corporate), will show you the financial-crime...to make each of them 'up for grab' by you!"

**...Rajan Raje**
(President : DharmaRajya Paksha)



- **CBI raids NDTV**
  *Adani buys NDTV*
- IT Raids On June'23 Sanghi Industries (Cement Sector)
  *Adani Takeover August 2023*
- Holcim India (Ambuja Cements and ACC) (Cement Sector), CCI raids in December 2020
  *In May 2022, Adani acquired Holcim India's Cement Businesses*
- ED raids GVK
  *Adani buys GVK's Mumbai Airport*
- Income Tax raids The Quint
  *Adani bought Quint*
- Income Tax raids Nellore Krishnapatnam Port
  *Adani bought Krishnapatnam Port*

**Moral of the story.**

Which establishment or Industry He wants to Buy will be raided by IT or ED.

It's just a small thing for them.

They raided politicians and freed them with a clean chit and offered them posts in government.

भारतीय वंशाचे जोहरान ममदानी हे, डोनाल्ड ट्रम्प यांच्या नाकावर टिच्चून, अमेरिकन भांडवलशाहीच्या अड्ड्यात न्यूयॉर्कचे महापौर म्हणून निवडून आले. भारताच्या आणि भारतीयांच्या विरोधात सातत्याने गरळ ओकणाऱ्या, डोनाल्ड ट्रम्प यांचा हा पराभव आहे. ममदानी स्वतःला अभिमानाने लोकशाहीवादी-समाजवादी म्हणवतात. अर्थातच, जागतिक भांडवली-साम्राज्यवाद्यांना ही एकप्रकारची चपराक आहे. परिणामी, जागतिक पुरोगामी लोकशाही चळवळींना, हा मोठा हुरुप देणारा विजय आहे.

याच अनुषंगाने, जोहरान ममदानी यांचा विजय साजरा करण्यासाठी, 'भारतीय कम्युनिस्ट पक्षा'च्या परळ (पू.) येथील दळवी बिल्डिंगमध्ये गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर-२०२५ रोजी, एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ममदानी यांच्या विजयोत्सवाच्या या कार्यक्रमाला 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे, कॉ. मिलिंद रानडे, कॉ. शैलेंद्र कांबळे, कॉ. अजित पाटील आणि कॉ. फिरोज मिठीबोरवाला आदी मान्यवर मंडळी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होती. हा कार्यक्रम सीपीआय, सीपीआय (एम), सीपीआय-एमएल (लिबरेशन) आणि 'हम भारत के लोग' या डाव्या विचारसरणीच्या पक्ष/संघटनांनी आयोजित केला होता. याप्रसंगी सर्व प्रमुख वक्त्यांनी अमेरिकेच्या आणि एकंदरीतच जागतिक भांडवलशाहीविरोधात जोरदार टीकास्त्र सोडले. दरम्यान, 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी, आपल्या घणाघाती भाषणात, गेल्या शतकभरातील अमेरिकन भांडवली-इतिहासाचा मागोवा घेत ममदानी यांच्या पुढ्यात उभ्या ठाकलेल्या आव्हानांचा आढावा घेतला व त्यातून डाव्या चळवळीने कुठल्या पद्धतीने व किती सावधगिरीने आपली भविष्यकालीन वाटचाल करायला हवी...याबाबत, रोखठोक प्रतिपादन केलं.

हे प्रतिपादन करताना, अमेरिकेचे ३२वे अध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी तत्कालीन ढासळती अमेरिकन अर्थव्यवस्था व



टोकाला पोहोचलेली 'आर्थिक-विषमता' सावरताना जोहरान ममदानींप्रमाणेच 'न्यू डील'द्वारे कशा व कुठल्या उपाययोजना केल्या होत्या व त्यांचं पुढे काय झालं...याचा ओघवता मार्गदर्शनपर धांडोळा घेतला.

महाराष्ट्राच्या महानगरांतील सार्वजनिक वहातूक-व्यवस्थेसह महाराष्ट्राच्या खेडोपाडी पसरलेली एसटीची सेवा कशी विनामूल्य करता येईल व त्यातून, कार्बनचं ऊत्सर्जन कमी होऊन 'जागतिक-तापमानवाढ' रोखण्यास कसा हातभार लावता येईल...याची डाव्या चळवळीने 'जोहरान ममदानी' व 'सिंगापूर'च्या धर्तीवर संगतवार मांडणी करत... वर्ष-२०२९च्या पुढील लोकसभा-विधानसभा निवडणुकीला सामोरं गेलं पाहिजे, अशी लाखमोलाची सूचना केली.

विजयोत्सवाच्या या कार्यक्रमाचे आयोजन कॉ. चारुल जोशी, कॉ. विवेक मॉन्टेरो, कॉ. श्याम गोहील, कॉ. गुड्डी एस. एल., कॉ. अमीर काझी आणि कॉ. अली भोजानी यांनी यशस्वीपणे केले.

## कम्युनिस्ट (माले)च्या दीपंकर भट्टाचार्यांकडून तर तशी खात्रीने आशा करता येईलच....

...पण, 'जनसुराज-पक्षा'चे सर्वेसर्वा प्रशांत किशोरसारख्या राजकारण्यांनी देखील सत्तारुढ होत, आपला प्रामाणिकपणा खरोखरीच कायम राखला (अरविंद केजरीवालसारखं अंशतः जरी अधःपतन झालं तर, सगळं संपलंच); तर, ज्या गुजराथी-भांडवलदारांनी बिहारी-कामगारांचे श्रम-रक्तघाम, अत्यंत स्वस्तात भांडवली-बाजारात बोली लावून (Labour-rbitrage) विकत घेतले व आजवर पिढ्यानपिढ्या बिहारी-कामगारांना भयंकर लुटलं...त्या गुजराथला धडा शिकवण्याची ऐतिहासिक सुवर्णसंधी, सध्याची बिहार विधानसभा-निवडणूक त्यांना देत आहे! ...भले, त्याकामी एकदोन पिढ्या खर्ची पडल्या; तरी, हरकत नाही...पण, जसं 'अमेरिके'ला पिछाडीला टाकत चीन, जगाचं उत्पादन-केंद्र बनला व 'भांडवलशाहीची मक्का' असलेल्या अमेरिकेपुढेच आव्हान उभा करता झाला; अगदी तसंच, बिहारला भारताचं उत्पादन-केंद्र बनवायचं...बिहारचा स्वस्त माल गुजरातमध्ये ओतत रहायचा आणि गुजराथची अवस्था 'अमेरिके'सारखी करत...'पलायनवादी बीमारु राज्य' म्हणून बदनाम झालेल्या बिहारचा पूर्ण कायापालट करुन टाकायचा! ...त्यातूनच, संघराज्यीय-चौकटीला उध्वस्त करत देशात हुकूमशाही लादू पहाणाऱ्या 'गुजराथी-लॉबी'ला मोठा दणका देता येईल. ***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

## इंडिगो : गाभ्यातील इश्यू.....

पृष्ठ क्र. ६ वरुन

**नियामक-मंडळाचे प्रमुख या सर्वांवर प्रभाव पाडण्याच्या पोझिशनमध्ये असते (सेबी, माधवी पुरी बुच, अदानीआठवतंय ना?).**

खुद्द अमेरिकेत फार्मा, वित्त क्षेत्रात हे सर्रास होत आहे. मग, भारताची काय अवस्था असेल ?

### मुद्दा अजून पुढचा आहे....

आपल्या देशात अनेक क्षेत्रात मोनोपोली, ड्युओपोली तयार झाल्या आहेत. त्या क्षेत्रात धोरणे, रेग्युलेशन इत्यादी बाबत काय 'Power Dynamics' चालते, याची माहिती आपल्याला मिळत नाही...कारण, त्यांना पाहिजे तेवढीच माहिती सार्वजनिक होते. एखाद्या इन्व्हेस्टीगेटिव्ह जर्नलिस्टने, जीवावर उदार होऊन काही धाडस केले तरंच....

पण, मक्तेदार भांडवलशाही प्रणालीबद्दल अंतर्दृष्टी आली की त्याचा उपयोग करुन, इतर उद्योगात काय होऊ शकते; याचे अंदाज बांधता येऊ शकतील. उदा मोबाईल सेवांमध्ये जिओ/एअरटेल, पेमेंटमध्ये Gpay/Phonepe यांची किंवा विमानतळ-बंदर क्षेत्रात अदानी समूहाचीयादी अपूर्ण आहे आणि रोज वाढते आहे.

***...संजीव चांदोरकर***

# कामगारांचे कैवारी कॉम्रेड अॅड. के. आय. किल्लेदारांना अखेरचा लाल सलाम !!

**सायन ते मुलुंड तसेच कुर्ला ते जोगेश्वरी या पट्ट्यातील औद्योगिक कामगारांच्या आणि इंडस्ट्रियल इस्टेटमधील छोट्या कंपन्यातील कामगारांना संघटित करण्यामध्ये आणि त्यांचे प्रश्न धडाडीने पुढे आणून स्थानिक पातळीवर मालकांच्या विरुद्ध संप निदर्शने घेराव मालकांच्या घरावर मोर्चे यासारख्या चळवळीच्या मार्गाचा अवलंब करून त्यांनी दीर्घ मुदतीचे संप लढवले. १९६० ते १९९० सालापर्यंतचा काळ हा कामगारांच्या चळवळी आणि लढ्यांनी गाजलेला काळ होता. महाराष्ट्र युनियन मान्यता आणि अनुचित प्रथा बंदी कायदा १९७१ साली जाहीर करून महाराष्ट्र सरकारने कामगारांच्या या आंदोलनावर बंधने टाकण्याचा प्रयत्न कामगार कष्टकऱ्यांच्या चळवळीने मान्य न करता त्यासाठी ''ईशान्य मुंबईत कामगार ऐक्यवर्धक समिती'' स्थापन करून संघर्ष केला.**

के. आय. किल्लेदार यांची ओळख सध्याच्या कार्यकर्त्यांना अत्यंत हुशार आणि कामगारांची बाजू ठामपणे कोर्टात मांडणारे निस्वार्थी, अभ्यासू, माहितगार वकील अशी आहे आणि ती शंभर टक्के खरी आहे. परंतु कॉम्रेड किल्लेदारांची सुरुवात प्रथमतः १९७०-१९७१ च्या काळात कमानी एम्प्लॉईज युनियन या युनियनचे लढाऊ कार्यकर्ते असलेल्या त्यांच्या मोठ्या भावाने त्यांना कॉम्रेड यशवंत चव्हाण यांच्या सारख्या ट्रेड युनियन चळवळीतील जेष्ठ नेतृत्वाकडे सुपूर्द केले आणि नुकतेच वकील झालेले तरुण किल्लेदार सर्व श्रमिक संघ आणि श्रमिक परिवारातील संघटनांच्या फिल्ड वर्कमध्ये सामील झाले. कुर्ला कमानी येथील आग्रा रोडवरील युनियनच्या कार्यालयातून त्यांनी कामकाजाला सुरुवात केली. त्याच काळात मी सुद्धा कामगार चळवळीत पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून दाखल झालो आणि आमची सात-आठ तरुण कार्यकर्त्यांची टीम लाल बावटा खांद्यावर घेऊन मैदानात उतरली.


सायन ते मुलुंड तसेच कुर्ला ते जोगेश्वरी या पट्ट्यातील औद्योगिक कामगारांच्या आणि इंडस्ट्रियल इस्टेटमधील छोट्या कंपन्यातील कामगारांना संघटित करण्यामध्ये आणि त्यांचे प्रश्न धडाडीने पुढे आणून स्थानिक पातळीवर मालकांच्या विरुद्ध संप निदर्शने घेराव मालकांच्या घरावर मोर्चे यासारख्या चळवळीच्या मार्गाचा अवलंब करून त्यांनी दीर्घ मुदतीचे संप लढवले. १९६० ते १९९० सालापर्यंतचा काळ हा कामगारांच्या चळवळी आणि लढ्यांनी गाजलेला काळ होता. महाराष्ट्र युनियन मान्यता आणि अनुचित प्रथा बंदी कायदा १९७१ साली जाहीर करून महाराष्ट्र सरकारने कामगारांच्या या आंदोलनावर बंधने टाकण्याचा प्रयत्न कामगार कष्टकऱ्यांच्या चळवळीने मान्य न करता त्यासाठी ''ईशान्य मुंबईत कामगार ऐक्यवर्धक समिती'' स्थापन करून संघर्ष केला. विक्रोळी येथील गोदरेज कारखान्यातील कामगारांनी त्यांच्या बहुमताच्या युनियनला मान्यता मिळावी यासाठी आणि मालक धार्जिण्या संघटनेच्या विरुद्ध झालेल्या तीव्र संघर्षाची त्याला पार्श्वभूमी होती. कामगार संघटनेला मिळणारी मान्यता ही गुप्त मतदानाने व बहुमताने ठरावली जावी आणि केवळ रेकॉर्डच्या आधारे मेंबरशिप रेकॉर्डच्या आधारे मान्यता ठरवणे योग्य नाही, कामगार आणि युनियनच्या पदाधिकाऱ्यांवर घातलेली अनुचित प्रथा बंदी कायद्यातील कलमे रद्द झाली पाहिजेत इत्यादीसाठी चाललेल्या संघर्षांमध्ये कॉम्रेड किल्लेदार सुद्धा आघाडीवर होते. परंतु आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर ८ सप्टेंबर १९७५ पासून महाराष्ट्र सरकारने हा कायदा लागू केला.

१९७५-१९७६ च्या आणीबाणीच्या काळात कामगार चळवळीवर अनेक बंधने आलेली असताना तेव्हाच्या २० कलमी कार्यक्रमातील किमान वेतन अंमलबजावणी व सावकारी कर्जातून मुक्ती या मुद्द्यांचा कामगारांची चळवळ संघटित करण्यासाठी उपयोग करून छोट्या कारखान्यातील कामगारांनी किमान वेतन अंमलबजावणीसाठी दिलेल्या लढ्यांमध्ये आम्ही सर्व सामील होतो. आणीबाणीच्या अडचणीत सुद्धा संधी शोधून २६ जानेवारी १९७६ रोजी किमान वेतन अंमलबजावणी परिषद घेऊन तसेच १ मे १९७६ रोजी कामगार दिन साजरा करण्यासाठी सभेला परवानगी नाकारल्यामुळे ''सगिना महातो'' हा दिलीप कुमारचा सिनेमा आयोजित करून कामगारांना संघर्षापासून मागे हटायचे नाही यासाठी आम्ही पुढाकाराने काम केले आणि त्याचा चांगला परिणाम झाला.

क्रमामध्ये कामगार चळवळीची गरज म्हणून फिल्ड वर्क मधून संपन्न अनुभव गुभव गाठीशी घेऊन, कामगार कष्टकऱ्यांचे जीवन अतिशय जवळून अनुभवून, त्यांच्या संघर्षामध्ये पोलीस केसेस मध्ये नेतृत्व करून कॉम्रेड किल्लेदार यांनी कामगार कष्टकऱ्यांचा पक्षपाती वकील अशा पद्धतीने कामगार न्यायालय, औद्योगिक न्यायालय ताडदेव मुंबई येथे सुरुवात करून आणि त्यानंतर ठाणे कोर्टामध्ये अनेक दशके समर्थपणे केले हे आपण सर्वांनी अनुभवलेले

...पृष्ठ क्र. १० वर

कामगार संघटनेला मिळणारी मान्यता ही गुप्त मतदानाने व बहुमताने ठरावली जावी आणि केवळ रेकॉर्डच्या आधारे मेंबरशिप रेकॉर्डच्या आधारे मान्यता ठरवणे योग्य नाही, कामगार आणि युनियनच्या पदाधिकाऱ्यांवर घातलेली अनुचित प्रथा बंदी कायद्यातील कलमे रद्द झाली पाहिजेत इत्यादीसाठी चाललेल्या संघर्षांमध्ये कॉम्रेड किल्लेदार सुद्धा आघाडीवर होते. परंतु आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर ८ सप्टेंबर १९७५ पासून महाराष्ट्र सरकारने हा कायदा लागू केला.



**राजन राजेसाहेब नमस्कार**

मला स्वतःला अस वाटतं की.... पुस्तकातून शिकायला गेलं तर झोप येते आणि राजेसाहेब आपल्या प्रखर विचारातून शिकवलं तर झोप उडून जाते...!!! खरंतर साहेब, वर्धापनाच्या दिवशी आम्हाला आपले नवीन विचार ऐकायचे होते; पण, काही कारणास्तव कामगारांना तुमचे ऊर्जा देणारे विचार ऐकता आले नाही, त्याची खूप खंत वाटते, त्यासाठी मी स्वतः उमाकांत ठाकरे तुमची सर्व कामगारांनाकडून माफी मागतो...**उमाकांत ठाकरे** *(वॉलमेट-कंपनी कामगार)*

(माझ्याकडून प्रतिसाद....)

हा प्रश्न, ही समस्या...फक्त, आपल्या वॉलमेट-परिवारालाच घेरुन आहे; असं मात्र अजिबात नाही. ती सगळ्या कामगारविश्वालाच वेढून आहे; ठीक आहे, चालायचंच उमाकांत...पण, अशा विपरीत स्थितीतही तुझ्यासारख्या अनेक कामगारांना, याची रास्त जाणीव आहे, हे ही नसे थोडके! दाटून आलेल्या पावसाळी आभाळातून सरसर वीज चमकून जावी आणि 'अवघा प्रकाशू व्हावा', तसा हा आशेचा किरण सोबत घेऊनच, कामगार कसेही वेडेवाकडे वागले; तरी, आमचं काम चालूच असतं आणि चालूच राहील.



उमाकांत, पाश्चात्य देशातले कामगार, खूप वाचन-मनन करतात. उदा. संपूर्ण युरोपची लोकसंख्या आपल्या देशाच्या लोकसंख्येच्या केवळ ३०% असूनही तिथे जगातली ७०% पुस्तके वाचली जातात, असं खुद्द 'ज्ञानपीठ-पारितोषिक' विजेते ख्यातनाम साहित्यिक भालचंद्र नेमाडे सांगतात...आणि वाचणाऱ्यांमध्ये, कामगार, बहुसंख्य असतात. त्यामुळे, आपले हक्क व राजकीय-सामाजिक जबाबदारी (ज्याला, आपण सर्वसाधारणपणे 'कामगारधर्म' संबोधतो) यासंदर्भात, तेथील कामगार खूपच जागरुक व प्रबुद्ध असतात...'तू मोठा की, मी मोठा किंवा तू शहाणा की, मी शहाणा', याचा अतिरेक करत, बाष्फळ गोष्टींमध्ये व क्षुद्र वृत्तींमध्ये ते बिलकूल अडकून पडत नाहीत...त्यांच्याम धील 'वर्ग-जाणीव' ही, सतत जागती असल्याने, त्यांच्या देशातलाच काय; तर, महाकाय बहुराष्ट्रीय कंपन्यांचा 'भांडवलदारवर्ग' देखील (ज्यात, सुपरव्हायझरपासून ते थेट MD dm CEO व संबंधित कंपन्यांचं 'संचालक-मंडळ'ही येतं), कामगारहिताला यःकिंचितही धक्का लावू शकत नाही! शिवाय, अडीअडचणीच्या काळात, दोन्ही वर्ग (कामगार व भांडवलदार) सामंजस्याने देखील व्यवहार करण्यास समर्थ असतात.

...आपल्याकडे जशी 'कंत्राटी-कामगार पद्धत' वा 'आऊटसोर्सिंग' (OutSourcing); तसेच, Profits are Private Losses are Public... यासारखी कामगारहितविरोधी धोरणं सर्रास कंपनी-दहशतवादातून (Corporate-Terrorism) राबवली जातात, तसं दृश्य तिथे अभावानेच दिसेल. तिथे स्पेन-अर्जेंटिनासारख्या अनेक देशांमधून रक्तपिपासू-निर्मम-शोषक 'भांडवली-व्यवस्थे'ला उत्तम पर्याय म्हणून, कामगारांच्या, कामगारांनी व कामगारांसाठी चालवलेल्या आणि महाकाय बहुराष्ट्रीय कंपन्यांना देखील टक्कर देऊ शकणाऱ्या कामगारांच्या सहकारी-तत्त्वा'वरील कंपन्या उत्तमरित्या कार्यरत आहेत!

राजकीयदृष्ट्या जागृत कामगार व कामगार-नेतेच तेथील राजकारण चालवतात; म्हणून 'लेक-वॉलेसा'सारखा (आपल्या 'वॉलमेट-कंपनी'च्या 'कमलेश कोल्हे'सारखा) कारखान्यात काम करणारा एक सामान्य 'कामगार', पोलंडचा राष्ट्राध्यक्ष झाला व आजही त्याच्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीचं उदंड गुणगान केलं जातं. मात्र, आपल्या देशात जाज्वल्य कामगार-नेत्यांना राजकारणात काळंकुत्रदेखील विचारत नाही; याचं कारणही तेच आहे...ते म्हणजेच, कामगारवर्ग, किरकोळ व बिनमहत्त्वाच्या अस्मितेच्या मुद्द्यांमध्येच गरगर फिरत रहातो, राजकीय-अंधश्रद्धांचा बळी ठरतो (अमुक एक मराठी नेते वा मराठी-माणसांचे म्हणवले जाणारे पक्ष, आपली समस्या दूर करतील, अशासारखी राजकीय-अंधश्रद्धा) व 'चिखलात दीर्घकाळ डुंबणाऱ्या म्हशीरेड्यांसारखा' त्यातूनच क्षुद्र आनंद मिळवण्यात धन्यता मानतो...यावर, कितीही प्रबोधन केलं; तरी, गेल्या चार दशकांपासून आजवर मला खात्रीलायक असं उत्तर मिळालेलं नाही. एक उपाय निश्चित आहे, तो म्हणजे संपूर्ण कामगार-चळवळ शंभर टक्के 'नितीमान' बनवणं व त्यातील 'व्यक्तिविशेष' कमीतकमी राखून कामगार-चळवळीला 'धोरण-विशेष' बनवणे आणि कामगारवर्गात 'वर्ग-जाणिवेसोबतच, योग्य 'राजकीय-जाणीव' निर्माण करणे... पण, ते हल्ली फारच अवघड जागेचं दुखणं बनलंय; कारण, तसे प्रयत्न करणं खूपच वेळखाऊ, कष्टदायक तर आहेच, पण बाहेरच्या भ्रष्ट-गलिच्छ राजकीय कुप्रभावाने, कष्टपूर्वक साध्य केलेलं यशही... कुठल्याही कारणाने वा कुठल्याही प्रसंगी हाताच्या ओंजळीतून पाण्यासारखं पटकन निसटून जाताना, उघड्या डोळ्याने पहावं लागतं! ...परिणामी, दिवसेंदिवस समस्त कामगार-कर्मचारीवर्ग गुलामीत ढकलला जात आहे आणि ते पहात बसणं, आपल्यासारख्या अनेकांना असह्य होत आहे!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# 'मराठी अभ्यास केंद्रा'च्या १८ डिसेंबरच्या मोर्चानिमित्त









विकासाला विरोध करणारे ते शहरी नक्षलवादी हे मुख्यमंत्र्यांचं विधान अत्यंत बेजबाबदारपणाचं आहे. मी या वाक्याचा निषेध करतो.

या वाक्याचा अर्थ महाराष्ट्रात हुकूमशाही सुरू केली असा होतो. ज्यांची जमीन जाणार ते शेतकरी विकासविरोधी ठरवून त्यांना नक्षलवादी ठरवलं जाणार आहे का? विधिमंडळात एखाद्या प्रकल्पाला विरोध करणारे आमदार नक्षलवादी ठरवले जाणार आहेत का?

स्वतः फडणवीसांनी विरोधी पक्षात असतांना अनेकदा प्रकल्पांना विरोध केला आहे, ते स्वतःला पूर्वलक्षी प्रभावानं नक्षलवादी ठरवणार आहेत का?

ही कोणती पद्धत आहे राज्य चालवण्याची?

महाराष्ट्रात योगी होऊन चालत नाही हे फडणवीसांनी वेळीच लक्षात घेतलेलं बरं. हा उत्तर प्रदेश नाही.

***- विश्वंभर चौधरी***

# ''कृषी कर्जाच्या नव्या वाटा : स्टेट बँक-कॉर्पोरेट भागीदारीचे अर्थराजकारण''

स्टेट-बँक... २५,००० शाखांचे प्रचंड जाळे, दुर्गम भागात पोहोचलेले ग्राहक सेवा केंद्र आणि एटीएमचे जाळे, ४८ लाख कोटींची मालमत्ता, सरकारच्या सगळ्या योजना राबवण्याची क्षमता आणि पायाभूत सुविधा असलेली भारतातली सगळ्यात मोठी बँक.

**२०१५ला बँकिंग परवाना मिळालेल्या जिओ-पेमेंट बँकेसोबत स्टेट-बँकेने सामंजस्य करार केलेला आहे, हा करार करताना स्टेट-बँकेच्या अध्यक्षा होत्या अरुंधती भट्टाचार्य. (त्याच त्या, शेतकरी कर्जाने अर्थव्यवस्था गाळात जाते म्हणणाऱ्या) या महिला निवृत्त झाल्यावर 'रिलायन्स'च्या संचालक मंडळात जाऊन बसल्यात.**

बरं, वरची बातमी जुनी आहे का? मग नवीन बातमी घ्या...

**२५,००० शाखा, ४८ लाख कोटींची मालमत्ता असलेली स्टेट-बँक, 'अदानी कॅपिटल' ज्यांच्या, ६३ शाखा आणि १,२९२ कोटींची मालमत्ता असलेल्या कंपनीसोबत सामंजस्य करार करतेय.**

कशासाठी? तर, कृषी कर्ज वितरण करण्यासाठी...

कृषी-कर्ज वितरण करायला, स्टेट-बँकेचे मनुष्यबळ, शाखांचे जाळे, अनुभवी कर्मचारी पुरेसे नाहीत का?

मग अदानी कशाला?

कारण, शेतकरी-कायदे माघारी घेतल्यावर झालेल्या नुकसानीची भरपाई कशी करायची आणि शेतकऱ्यांची मान




कशी पिरगळता येईल याची तरतूद नको का?

मग 'अदानी कॅपिटल' जर स्टेट-बँकेच्या नळाला तोटी सोडायला बसली तर, कुठल्या शेतकऱ्याला, कुठल्या राज्याला, कुठल्या प्रदेशाला, कुठल्या पिकाला किती कर्ज द्यायचं, द्यायचं की नाही द्यायचं हे कोण ठरवणार? तर, 'अदानी कॅपिटल'...

**अदानी ॲग्रो लॉजिस्टिक आधीच आलेली आहे, जिने देशभरात विशेषतः हरियाणा-पंजाब-राजस्थानमध्ये, मोठमोठे लोखंडी गोदाम उभारलेले आहेत, खाजगी रेल्वे लाईन टाकलेली आहे. त्यांना शेतकऱ्यांचा शेतमाल विकत घेऊन साठवून, योग्यवेळी विकायचा आहे.**

आता ज्यांना कर्ज हवं आहे, त्यांनी माल कुठे विकायचा, कुठल्या गोदामात ठेवायचा, याची बंधनं बँकेच्या वतीने घातली गेली तर, काय होईल?

कृषीकर्जाच्या नावाने, याच कॉर्पोरेट कंपन्यांच्या गोदाम, शेतमाल साठवणूक आणि प्रक्रिया करणाऱ्या अतिप्रचंड कारखान्यांना कर्जे वाटली तर काय होईल?

स्टेट-बँकेचे कर्मचारी, ब्ला ब्ला म्हणणाऱ्या शहरी लोकांनी, कॉमेंट जपून कराव्यात... कारण, अजूनही भारतात सगळ्यात भक्कम जाळं असलेली ही बँक, ग्रामीण भागात सरकारच्या सगळ्या योजना पोहोचवायला कामाला येत असते. **साठच्या दशकात, सुस्मृत यशवंतराव चव्हाण आणि इंदिरा गांधी यांनी कृषीक्षेत्र, लघु आणि मध्यम उद्योगांची उभारणी करायला, पतपुरवठा सुरळीत व्हावा या उद्देशाने, बँकांचे राष्ट्रीयकरण केलेलं होतं, स्टेट-बँकेचा हा करार नेमका या उद्देशाच्या उलट आहे. हा देश सरकार चालवतं, हा भ्रम डोक्यातून काढून टाका. हा देश सरकारचे बाहुले ज्यांच्या मांडीवर बसलेले आहेत, तेच मालक चालवतात. सरकारचे प्रतिनिधी फक्त कळसूत्री बाहुल्या आहेत.**

हा 'ईस्ट इंडिया' कंपनीचा आधुनिक भारतीय अवतार आहे... बाकी लोकांनी या सगळ्या बाबींकडे दुर्लक्ष करावं म्हणून, मिडिया आहेच. आपल्यासमोर भारत-पाकिस्तान, लव्ह जिहाद, हिंदू-मुस्लीम, राममंदिर यासारखे तुकडे चघळायला टाकायला !!!

**''वेलकम टू न्यू इंडिया''**

***....आनंद शितोळे***

## कामगारांचे कैवारी कॉम्रेड ॲड. के. आय. किल्लेदारांना अखेरचा लाल सलाम !!

...पृष्ठ क्र. ८ वरुन

आहे. कामगार संघटनेने परिस्थितीचे योग्य मापन करून चळवळीच्या मार्गाने आणि कायदेशीर मार्गाने संघर्ष करून कामगारांच्या हक्काचे संवर्धन करण्याचे कार्य केले पाहिजे. एकांगी मार्गाने आपण पुढे जाऊ शकणार नाही या विचाराने ते कार्य करत राहिले.

कायद्याच्या अभ्यासा बरोबरच प्रत्येक केसमधील वस्तुस्थितीचा म्हणजे फॅक्स बाबत त्यांच्या सखोल अभ्यास असे त्यामुळे कामगारांची बाजू समर्थपणे मांडून, मालकाने उपस्थित केलेले मुद्दे वस्तुस्थितीशी कसे विसंगत आहेत हे उलट तपासणी मधून कोर्टासमोर आणण्यामध्ये त्यांचा हातखंडा होता. खालच्या न्यायालयात झालेल्या निवाड्याविरुद्ध मालक वर्ग नेहमीच उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयापर्यंत धाव घेतात. अशावेळी उच्च न्यायालयातील आणि सर्वोच्च न्यायालयातील वकिलांना सुद्धा कामगारांच्या केसेस मधील बारकावे लक्षात आणून देण्याचे काम किल्लेदारांनी नेहमीच केले आणि त्याचा ज्येष्ठ वकिलांना सुद्धा उपयोग झाला. त्याचप्रमाणे कोर्टामध्ये काम करणाऱ्या अनेक ज्युनिअर वकिलांना मार्गदर्शन केले. त्यांच्याशी चर्चा विनिमय केल्यावर अनेक नवीन मुद्दे समजायला मदत होत असे असा सर्वांचा अनुभव आहे.

पगारवाढ, महागाई भत्ता वाढ, बोनस इत्यादी सामुदायिक मागण्यांबाबत न्यायालयासमोर कामगारांची बाजू मांडण्याच्या त्यांचा प्रदीर्घ अभ्यास होता आणि त्यामुळे अनेक चांगले निवाडे झाले. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे कंत्राटी म्हणून कायम कामगारांचे हक्क नाकारलेल्या शेकडो कामगारांना कायम नोकरी मिळावी म्हणून झालेल्या कायदेशीर संघर्षामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण निवाडे मिळवले आणि अनेक कामगार कुटुंबीयांच्या जीवनामध्ये आमूलाग्र सुधारणा होऊ शकली.

सर्व श्रमिक संघ या औद्योगिक आणि सेवा क्षेत्रातील कामगारांच्या संघटनेचे ते अनेक वर्षे कार्याध्यक्ष सुद्धा होते. सभासदांना त्यांनी सातत्याने मार्गदर्शन केले नवीन कामगार कायदे येऊ घातले आहेत अशावेळी चार-पाच दशकांचा कामगार चळवळीचा आणि कायद्याचा सखोल अभ्यास असलेले कॉ. किल्लेदार आज आपल्यात नाहीत. त्यांची उणीव सर्वांनाच जाणवते. यापुढे सामुदायिकपणे आपण सर्वांनी प्रयत्न करून, त्यांच्यातील अभ्यासू वृत्ती व आपणही जोपासून, त्यांची उणीव भरून काढण्याचा आणि आपल्यावर होणाऱ्या हल्ल्याचा प्रतिकार करण्याचा निर्धार करूया. हीच कॉ. किल्लेदार यांना श्रद्धांजली होईल.



***कॉ. दीपक भालेराव***
सरचिटणीस : सर्व श्रमिक संघ, मुंबई
संपर्क क्र.: ९१३७०६३७२४
कामगारांचे कैवारी कॉम्रेड ॲड. के.आय. किल्लेदारांना अखेरचा लाल सलाम !!

# 'एपस्टिन फाईल्स'च्या निमित्ताने....

## Jeffrey Epstein's Sting-Operation & It's Impending Stinging Effect On Stinking Indian Politics...??? Forget Not...We have been trained since school days : "Man is known by the company he keeps...!!!"

**पं. नेहरुंची काय किंवा सोनिया गांधींची काय...'फोटोशॉप'मधून बनवलेल्या खोट्यानाट्या फोटोंआधारित बदनामी करणारी व हिरेन जोशीच्या इशाऱ्यावर काम करणारी 'अमित मालवीय'फेम बीजेपी 'आयटी-गँग'...आणि, काश्मीरपासून केरळपर्यंतच्या बोगस 'फाईल्स' सिनेमाच्या पडद्यावर झळकावून, भारतात जातधर्मविद्वेषाचा विखार पसरवणारे 'अंधभक्त'... 'एपस्टिन फाईल्स' प्रकरण, जर यदाकदाचित खरंच तडीस गेलं; तर, कुठल्या अवस्थेत असतील? जागतिकस्तरावरुन एकूणच जे संकेत प्राप्त होताहेत, त्यानुसार सतत दिसेल त्याला, जातधर्मद्वेषाचा विषारी डंख मारणाऱ्या आणि पं. जवाहरलाल नेहरु व म. गांधीसारख्या जगविख्यात व वंदनीय व्यक्तित्वांची बदनामी करत त्यांच्यावर विषयुक्त 'फुत्कार' टाकणाऱ्या नागांना, थेट बिळं गाठावी लागू शकतात....**


भारतात इस्रायली बनावटीचं 'पेगॅसस' हे हेरगिरी करणारं सॉफ्टवेअर पाठवणाऱ्या इस्रायलच्या, एका पाशवीवृत्तीच्या मोठ्या शक्तिशाली 'नेत्या'वर, 'एपस्टिन-फाईल्स' प्रकरणातील पिडीत तरुणींनी जे आरोप केल्याचं समजतं...ते पहाता, सुसंस्कृत काळजाचा थरकाप उडावा, एवढ्या नृशंस पद्धतीने तो माणूस अल्पवयीन मुलींचं कथितरित्या लैंगिक-शोषण करत होता...मग, गाझामध्ये जो क्रौर्यपूर्ण वंशविच्छेद, गेली दोनअडीच वर्षे चाललाय, त्यात आश्चर्य ते कसलं?

जेफ्रे एपस्टिन हा अमेरिकी ज्यू, इस्रायलची कुख्यात गुप्तचरसंस्था 'मोसाद'चा अट्टल हेर होता आणि तो पडद्याआडून बऱ्याच राष्ट्रप्रमुखांना, पद्धतशीर गोळा केलेल्या छुप्या व्हिडिओ व फोटोंमधून सरळसोट 'ब्लॅकमेल' करत होता.

जगभरातून पैसे मोजून (संबंधित मुलींच्या वा त्यांच्या कुटुंबियांच्या असहायतेचा गैरफायदा घेत) वा अन्य गुन्हेगारी मार्ग अवलंबून उफाड्याच्या अल्पवयीन मुली गोळा करायच्या (लैंगिक-तस्करी...Human-Trafficking)...त्यातही, जास्त वयाच्या मुलींची 'भेसळ' होऊ नये, म्हणून चक्क 'आयडी-कार्ड' तपासून त्या मुली १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या असल्याची (त्यातल्या, चांगल्या चणीच्या कित्येक मुली १२-१३ एवढ्या कमी वयाच्यादेखील असायच्या) पूरेपूर खात्री करुन घ्यायचा...आणि, बड्या धेंडांच्या नृशंस-वासनापुर्तिसाठी त्यांच्या पुढ्यात लोटायचा (डोनाल्ड ट्रम्प यांची बायकोच, काही मुलींना अशा लोकांसह, आपल्या नवऱ्यापासूनही सावध रहाण्याचा इशारा देताना आपल्याला दिसते).

ही सारी... पैसा, सत्ता आणि लैंगिक-वासनेनं वखवखलेली दोन पायांची श्वापदं, जर माणसंच म्हणायची; तर, तो अशा माणसांचा 'कळप' आहे की, ते जेथून येतात, ज्यांचं प्रतिनिधित्व करतात...त्या लोकांची त्यांना काडीचीही पर्वा नाही...त्यांच्यासाठी, माणसांसकट सगळं 'सजीवविश्व', हे एक फक्त उपयुक्ततेचं व उपभोगाचं संसाधन आहे, ज्याचा हवा तसा वापर करायचा व यथेच्छ ओरबाडून त्याचा आस्वाद घ्यायचा, बस्स! ते एका वेगळ्याच उपग्रहावर जगत असतात... त्या त्यांच्या निवडक 'जत्थ्या'पलिकडे, त्यांच्यासाठी सारेजण जणू फक्त, पृथ्वी नावाच्या ग्रहावरचे 'ग्राहक' असतात... असे 'ग्राहक' की, ज्यांचं 'माणूसपण', त्यांनी या क्रौर्यपूर्ण 'नवउदारमतवादी (Neo-Liberalism) भांडवली-व्यवस्थे'तून नाकारल्याला, आता जवळपास पाच दशके उलटून गेलीत!

त्यांच्या निष्ठा फक्त आपापसातच विभागलेल्या आणि केंद्रित झालेल्या असतात आणि म्हणूनच, त्यांना जोडणारा एक एपस्टिनसारखा नरपिशाच्च 'दुवा' म्हणून लागतो... एका अर्थाने, हे एक ''शोषकांचं आणि श्वापदांचं मोठं कुटुंब''च होय! ''त्यांच्याकडे ढीगभर पदव्या, राजकीय-प्रशासकीय सत्तेचा दांडगा अनुभव, सरकारी-मानमरातब व अफाट ऐश्वर्य असेल; पण, माणूसपणाच्या भिंगातून पहाता, ही माणसं, कुठल्या दर्जाची आहेत? ही लोकं यांच्या अल्लड मुली, नातींशी असाच व्यवहार करणाऱ्यांशी देखील, अशीच उठबस करतील काय, असाच 'दोस्ताना' ठेवतील काय...हा मूलभूत प्रश्न आहे. कुठल्या 'मानवी न्याय-सन्माना'ची यांच्याकडून अपेक्षा करायची?? कल्पना करा, त्यांनी आपल्या राजवटीत काय आणि कसले न्यायनिवाडे केले असतील, निर्णय घेतले असतील वा धोरणं राबवली असतील???



...हीच लोकं आजवर आपल्या आयुष्याबद्दलचे निर्णय घेत आलीत; त्यामुळेच, तुमच्याआमच्या आयुष्यात दुःख आहे, वेदना आहे आणि म्हणूनच, तुमच्याआमच्या साध्यासुध्या गरजा अपुऱ्या रहातायत... कारण, ही माणसं, तुमची माणूस म्हणून ओळख कायम नाकारत आलीत!

**अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांचा आर्थिक-सल्लागार व जगविख्यात हार्वर्ड-विद्यापीठाचा प्रमुख राहिलेला लॅरी सॅमर्स, हा 'अवघे पाऊणशे वयोमान' असलेला, 'हिरव्या देठा'चा अर्थतज्ज्ञ, एखाद्या षोडशवर्षीय नवथरासारखा एपस्टिनकडे निरर्गलपणे 'डेटिंग-डव्हाईस' मागतो...आणि, विशेष बाब नमूद करायची; तर, याच लॅरी सॅमर्सची बायको, त्याचवेळेस एपस्टिनकडे अमेरिकन चित्रपट निर्माता व नट असलेल्या 'वूडी लन' याची खाजगी भेट कशी मिळवता येईल, याची विचारणा करत असते. हे सगळं, केवळ अमेरिका भांडवलशाहीची 'मक्का' असण्याचंच नव्हे; तर, बलात्कारी, लिंगपिसाट, मनोविकृत डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'मागा' (MAGA...Make America Great Again) या पराकोटीच्या स्वार्थी व संवेदनशून्य धोरणाचं देखील विषारी फळ आहे. वर्ष-२००८च्या 'सबप्राईम' भांडवली-घोटाळ्यातील दोषींना, कडक शिक्षा करण्याऐवजी, त्यांना अमेरिकन जनतेच्या कररुपी पैशातून लाखो डॉलर्सची खैरात वाटणारा, हाच तो बदमाष गडी..लॅरी सॅमर्स!**

डेमोक्रॅटिक काँग्रेस-सदस्य 'रो खन्ना' आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अमेरिकी न्याय-विभागावर (DOJ... Department Of Justice)...१९ नोव्हेंबरला उघड केलेल्या 'फाईल्स'मधील प्रतिमा धूसर केल्या जाण्याचा (Redaction), ईमेलमधली नावं पुसली जाण्याचा तसेच, शेकडो पानं कोरी व त्यातील काही गहाळ केल्याचा अतिगंभीर आरोप केलाय. खरंतर, ही सगळीच 'हैवान' मंडळी...खुलासा कमी आणि लपवाछपवी जास्त करण्यात सध्या दंग आहेत! बड्या नेत्यांच्या बद्दलची सगळी माहिती, यापूर्वीच नष्ट केली गेलीय. कुठे आहे अमेरिकी-पारदर्शकता...की, १९७२च्या रिचर्ड निक्सन या भूतपूर्व अमेरिकी अध्यक्षांच्या 'वॉटरगेट' प्रकरणासारखी 'All the President's Men'', दारुण अवस्था आहे सध्याची?

**एपस्टिन पहिल्या खेपेस १३ महिन्यांच्या तुरुंगवासाच्या 'मॅनेज्ड' शिक्षेने सुटतो आणि त्याही दरम्यान दररोज १२ तास स्वतःच स्थापन केलेल्या एका संस्थेत 'सोशल किंवा कम्युनिटी सर्व्हिस' करण्याची सवलत मिळवता होतो (म्हणजे, फक्त झोपण्यापुरताच तुरुंगात) आणि नंतर तर, त्याची दुसऱ्या खेपेस न्यूयॉर्कमधील तुरुंगात अतिशय संदिग्ध व संशयास्पद अवस्थेत आत्महत्या झाल्याचं जगासमोर येतं...भरीसभर म्हणून, ही आताची जगातल्या काही राष्ट्रप्रमुखांना व बड्या धेंडांना वाचविण्यासाठी चाललेली, लपवाछपवी व पुराव्यांमध्ये फेरफार करण्यासाठीची प्रचंड धावपळ...नेमकं काय दर्शवते?**

राष्ट्रीय-सुरक्षेच्या बेगडी भूमिकेचा आधार घेत, अमेरिकी-प्रशासनाकडून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात असल्याबद्दल वा पुराव्यांमध्ये खोडाखोड-अदलाबदल केली जात असल्याबद्दल...अमेरिकी न्याय-विभागावर व अमेरिकन अध्यक्षांवर 'महाभियोग' (Impeachment) आणण्याची 'रो खन्ना' यांनी केलेली घोषणा, या संदर्भात अतिशय महत्त्वपूर्ण ठरावी.

पण, या सगळ्यातून आमचा कामगार-कर्मचारीवर्ग काही बोध घेणार आहे का, कुठला धडा शिकणार आहे का... हे सगळ्यात जास्त महत्त्वाचं आहे. 'लैंगिक-शोषणा'पासून अनेकविध गैरप्रकार, औद्योगिक-क्षेत्रात ...पृष्ठ क्र. १३ वर

# मराठी माणूस संपवण्याचं कट-कारस्थान!

### राजकारणाला तुम्ही नाकारलंत; तर, राजकारण तुम्हाला नाकारतं....

राजकारण, हे तुमचं हवापाणी, अन्न-वस्त्र-निवारा, आरोग्य-शिक्षण व जगण्यातल्या सुरक्षिततेसह सगळ्याच बाबी ठरवत असल्याने... मला काय त्याचं, या वृत्तीने राजकारण पराङ्मुख राहिल्याने बदमाषांचं फावतं आणि सॅम्युअल जॉन्सन व मार्क ट्वेन म्हणतो तसं, Patriotism and Politics, is the last refuge of a scoundrel ठरतं... आणि, कामगारांसारख्या पिरॅमिडच्या तळाच्या वर्गाला त्याची भयंकर कटू फळं भोगावी लागतात!

सध्या भारतात, विशेषतः महाराष्ट्रात, कामगारवर्गाचं 'बिगर-राजकियीकरण' (Depoliticisation) अगदी टिपेला पोहोचलंय...भारताचं सोडाच, जगातल्या अगदी पहिल्यावहिल्या 'समाजवादी-साम्यवादी' रशियाचं उदाहरण घेतलं; तरी लेनिनपश्चातच्या प्रदीर्घ कालखंडात रशियन-कामगारांचंही पुरेसं सशक्त व सखोल 'राजकीय-प्रशिक्षण' न झाल्यानेच...नव्वदीत सोविएत युनियनच्या पतनानंतर साधा निषेध म्हणूनही 'राजकीय-प्रशिक्षणशून्य' रशियन कामगारांनी ना संप केला, ना ते रस्त्यावर उतरले! महाराष्ट्रात डॉ. दत्ता सामंतांसारख्या लढवय्या कामगार-नेत्याची तत्कालीन भांडवली-व्यवस्थेकडून कट रचून हत्या झाल्यानंतरदेखील, मराठी-कामगाराने घरात बसून रहाणेच पसंत केले होते. डॉक्टरांच्या हत्येसोबतच कामगार-चळवळीचं एक पर्व संपलं आणि महाराष्ट्रातील कामगार-चळवळीची मृत्यूघंटा कर्णकर्कश्श स्वरात घणघणायला लागली! जगभरात कामगार नेते व कामगार-चळवळचं राजकारण चालवते; पण, आपल्याकडे राजकारणाप्रति 'उदासीन' असणाऱ्या वा 'विपरीत वर्ग-जाणीव' बाळगून जातधर्मात अडकलेल्या बहुतांश कामगारांमुळे, कामगार नेत्यांना राजकारणात काळ कुत्रंदेखील विचारत नाही... ही शोकांतिका, त्या कामगार-नेत्यांची नसून भांडवली-व्यवस्थेकडून रोज वेगवेगळ्या प्रकारचे आघात झेलणाऱ्या कामगार-कर्मचारीवर्गाची आहे!

### 'मराठीत्व', हेच 'राष्ट्रीयत्व'....

...लक्षात घ्या, भारत हा देश म्हणून कधिही एकसंध नव्हता, आजही नाही आणि उद्याही नसेल... घटनात्मकदृष्ट्या 'भारतीय-नागरिकत्व' एकचं असलं; तरीही प्रत्येक राज्याचं, प्रत्येक भाषिकाचं स्वतंत्र वेगळं असं 'अस्तित्व' आहे... म्हणूनच 'अलिखित' स्वरुपाचं; पण, व्यवहारतः कार्यरत असं, वेगळं 'राष्ट्रीयत्व' देखील आहे! त्याअर्थानेच 'मराठीत्व' हेच, महाराष्ट्राचं प्राथमिक 'संघराज्यीय-राष्ट्रीयत्व' आहे! हे प्रत्येक राज्याचं विभिन्न 'राष्ट्रीयत्व', त्यांच्या त्यांच्या राजकारण्यांनी बव्हंशी जपलं. उत्तरेतल्या राजकारण्यांनी 'भारतीय राज्यघटने'अंतर्गत भारताच्या कुठल्याही भागात-प्रदेशात जाऊन निवास, व्यवसाय, नोकरी वगैरेचं मुक्त-अनिर्बंध स्वातंत्र्य, आपल्या राजकारणातल्या व घटना-समितीतील 'संख्या-दबावा'ने उत्तरेतल्या लोंढ्यांच्या सोयीसाठी, असं खास मिळवल्यानंतर... तिथल्या राजकारण्यांची बदमाषी, भ्रष्टाचार व अकार्यक्षमता झाकली रहाण्याची आपसूकच तरतूद झाली; जसा, 'कंत्राटी-कामगार पद्धती'मुळे फारच तुटपुंज वेतन देता येण्यानं, कॉर्पोरेटीय व्यवस्थापकीय मंडळींचा भ्रष्टाचार, अकार्यक्षमता, बदमाषीपूर्ण व्यवहार झाकला रहाण्याची उत्तम सोय झाली. आमच्या आघाडीच्या मराठी राजकारण्यांकडून 'मराठीत्व' जपण्याची आपल्या राजकारणापुरती, सोयीची नौटंकी तरी करण्यात आली किंवा त्यांच्यापैकी कुणाकुणाला 'जाणता राजा' वगैरे बनण्याचं सोंग वठवत पंतप्रधानपदाची स्वप्न पडत होती; तर, कुणाकुणाला कसलं कसलं 'सम्राट' व्हायचं होतं आणि ते शिक्षण, आरोग्य, बांधकाम वगैरे क्षेत्रात; तसेच, जातधर्मीय भावनिक राजकारणात 'सम्राटपट' भूषवते झाले देखील! पण, भांडवलदारांची दलाली करण्याच्या त्यांच्या फसव्या व अवसानघातकी राजकारणामुळे... एकीकडे त्यांनी 'कंत्राटी-कामगार पद्धती'ला आशिर्वाद देत, कामगार-चळवळीच्या गळ्याला नख लावलं आणि दुसरीकडे







राजकारणात-अर्थकारणात 'मराठीत्व' जपण्याऐवजी... मराठी-माणसाचं गुजराथी-मारवाडी-जैन भांडवलदार (वरच्या बाजुने) व उत्तरेतले घुसणारे लोंढे (खालच्या बाजुने) असं एक 'मराठीघातकी सँडविच' तयार करुन, त्यात 'मराठीत्व' भरडून टाकलं! 'उत्तर-पश्चिमेतले लुटारु-भांडवलदार गुजराथी आणि उत्तर-पूर्वेतले 'कंत्राटी-गुलाम' असलेल्या भैय्यांचे लोंढे' (ज्यांना भले ते थोडं चुकीचं असलं तरी 'भैय्ये', या एकाच मापाने आपण मोजतो), यांच्या अडकित्यात सापडून, महाराष्ट्र जीर्णशीर्ण-विदीर्ण झालाय!

### दुर्दैवाने, जनतेला झोपेतून जागे करणारे राजकारणी नको असतात...तिचं 'सांत्वन' करुन तिची झोपमोड होऊ न देणारे, हवे असतात....

जगाच्या आजवरच्या इतिहासावरुन ध्यानात येईल की, अभावाने वा अपवादानेच सर्वसामान्य जनता, व्यवस्थेतल्या आमूलाग्र व क्रांतिकारक बदलाच्या बाजुने उभी रहाते...जेव्हा कधि, जनकल्याणाचा मूलभूत विचार करणाऱ्या जातिवंत-प्रामाणिक राजकीय नेत्याला वा राजकीय पक्षाला ती आपलं नेतृत्त्व बहाल करते; तेव्हाच, तिच्या हालअपेष्टा थांबतात व जगण्यात स्थैर्य व सुखसमाधान-शांति येते.

दुर्दैवाने तिला 'जपजाप्य-पूजाहवन करा, निवेदनं द्या, रामनामाने वह्या भरा, देवदर्शनासाठी पायपीट करा वा तासनतास रांगेत उभं रहा'...म्हणजे, तुमचे ग्रहदोष दूर होऊन ईश्वर तुमच्यावर कृपेचा वर्षाव करेल; असं सांगून तिचं 'सांत्वन' करणारे धर्मसंप्रदायाचे दुकानदार फार प्रिय असतात किंवा सतत संपर्कात राहून अडीनडीला, किरकोळ मदतीसाठी धावून येणारे वा प्रसंग आनंदाचा असो अथवा दुःखाचा... आपल्यासमोर तत्काळ उभे ठाकणारे राजकारणी आवडतात (जे तसेही, नोकरीधंदा न करणारे 'बिनकामा'चे सदैव मोकळे वा मोकाटच असतात). लहान मुलांच्या हातात खेळणी देऊन त्यांना तात्पुरतं गप्प करण्यासारखीच...जनतेला अन्याय-शोषणाविरुद्ध शांत राखण्यासाठी, ही कृत्ये वरकरणी त्यांना करावी लागतातच... तिचं त्यांची 'शक्ति' व तिचं त्यांची मर्यादा'!

...पण, त्यामुळेच जनतेचं पिढ्यानपिढ्या फार मोठं नुकसान होत रहातं व तिच्या आयुष्यात सुखासमाधानाचा 'आनंदरस' निर्माण होण्याऐवजी; जगणं, एक अडीअडचणींची, रोजच्या संघर्षाची 'सर्कस' बनते. हे जे असलं फुटकळ राजकारण करणारे 'सर्ववेळ' (Full time or ll time politicians) राजकारणी असतात... ते मूलभूत स्वरुपाची कुठलीही कामं करताना कधिही दिसत नाहीत, दिसणार नाहीत; उदाहरणच घ्यायचं झालं तर, दर्जेदार आरोग्य व शिक्षण सेवा सार्वजनिक क्षेत्रात उभारणे, कामगारांना नोकरीत सुशिक्षितता व सन्मानजनक वेतनमान देणे, लोकांना सहजी परवडेल अशापद्धतीने शहर-उपनगरांतून चांगला 'निवारा' उपलब्ध करुन देणे, भ्रष्टाचाराच्या मुळावर आघात करणे वगैरेंचं घेता येईल.

### मराठी-माणसाच्या चुका आणि तो आपल्या चुकांची भोगत असलेली सजा....

नोकरीच्याच नव्हे; तर, व्यवसायाच्या संधिही दुरापास्त झाल्यानेच मराठी सुशिक्षित लोकंदेखील अमेरीका, इंग्लंड, कॅनडा वगैरे ठिकाणी स्थलांतर करतायत... सोपं नाही तिथे जगणं, खूप कष्टाचं आहे; तरीही, ते त्यांना रुचतं, परवडतं... एवढी वाईट अवस्था महाराष्ट्रानं स्वतःची करवून घेतलीय.

आपल्यावर अन्याय होत असूनही महाराष्ट्राने 'राज्यघटना' निमूटपणे बिनतक्रार पाळत, हे सगळे परप्रांतीय लोंढे सामावून घेतले... पण, ते आमच्या राजकारण्यांना आपल्या पंखाखाली घेत, आता आमच्याच मुळावर उठलेत....हो, आम्ही मराठी माणसं चुकलो, खूप खूप चुकलो आणि पिढ्यानपिढ्या त्याची फळंही भोगली की! अजून किती भोगायची? आम्हाला काय तुम्ही फासावर लटकवणार की काय? संबंधितांनो, लक्षात ठेवा, फासावर फक्त खून केल्यानंतरच लटकवता येतं!

आम्ही आजवर चुकीचे राजकारणी निवडले, चुकीचं राजकारण केलं...पण, याचा अर्थ, तुम्ही आमची मरणाची 'कोंडी' करायला मोकळे आहात, असा मात्र होत नाही. आमच्या उद्धारासाठी लोकशाही व सनदशीर मार्ग शोधायला आम्ही कधिही मोकळे आहोत आणि तो मार्ग आम्ही आमच्यासाठी निवडूच!

'कंत्राटी-कामगार पद्धती'ने तुम्ही कामगार-चळवळचं नव्हे; तर मराठी-माणूसच संपवत आहात...ते ही त्याच्या हक्काच्या लालकाळ्या मातीच्या शिवछत्रपतींच्या महाराष्ट्रातून... हे ध्यानात न येण्याएवढे आम्ही मूर्ख, अज्ञानी नाही.

(क्रमशः)

# बाबासाहेबांचा आर्थिक-समतेचा संदेश, व्यवहारात उतरवणे गरजेचे!



**निव्वळ राज्यघटनेचं कौतुक करत रहाण्यापेक्षा अथवा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुण्यस्मरणाच्या सोहळ्यांचं अवडंबर माजवण्यापेक्षा... ''त्यांचा आर्थिक-समतेचा संदेश व्यवहारात उतवण्यासाठी राजकीयदृष्ट्या कार्यरत रहाणं, सद्यस्थितीत अत्यावश्यक आहे.''**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ७०व्या महापरिनिर्वाणदिनी बाबासाहेबांना 'राज्यघटनेचे शिल्पकार', या भूमिकेपलिकडे जाऊन...'समतेच्या संदेशा'तून 'सामाजिक व आर्थिक' न्याय देऊ पहाणारा 'महामानव' म्हणून पहाणं, अधिक गरजेचं आहे....

'राज्यघटनेचा शिल्पकार वा दलितांचा मसीहा'; या तुलनात्मकदृष्ट्या काहीशा मर्यादित भूमिकेत त्यांना पहाणं...म्हणजे, ''कोहिनूराच्या हिऱ्या'ला अंगठीत कोंडून टाकणं!'' शिवछत्रपती असोत वा असोत बाबासाहेब...त्यांचा प्रामुख्याने भर, संपूर्ण समाजाचं आर्थिक-उन्नयन करण्यावर व तळागाळातील समाजघटकांसाठी शक्य तेवढं सन्मानजनक जीवनमान सुनिश्चित करण्यावर होता. 'तलवारधारी' शिवछत्रपतींपेक्षा 'नांगरधारी' शिवछत्रपती (न्याय-समतापूर्ण प्रशासकीय व्यवस्था लावणारे) हे अधिक महत्त्वाचे; तसेच, 'राज्यघटना' हाती घेतलेल्या बाबासाहेबांपेक्षाही 'समतेचा-संदेश' देणारे बाबासाहेब, जनसामान्यांसाठी अधिक महत्त्वाचे! शिवछत्रपतींना परिस्थितीवशात कराव्या लागलेल्या लढायांतून राज्याचं परचक्रापासून संरक्षण झालं व जनतेसाठी न्यायाची जरुर सुनिश्चिती झाली; पण, त्यातून आपसूक तळागाळातील रयतेचं जीवन सुखीसमाधानी होणारं नव्हतं...त्याकामी, शिवछत्रपतींनी जाणिवपूर्वक प्रशासकीय धोरणं आखत, ते उच्चतम ध्येय व्यवहारात उतरवलं, उदा. जनतेला नागवून गडगंज संपत्तीचे धनी झालेल्यांच्या गडकोटांवर गाढवाचे नांगर फिरवून त्यांनी 'संपत्तीचं फेरवाटप' (Redistribution of Wealth) केलं... भूहिनांना कसायला 'मालकी-हक्का'ने जमिनीचे पट्टे व शेतीसाठी बीजभांडवल दिलं आणि त्यांच्या जगण्यात आत्मसन्मान व स्थैर्य आणलं...''एका अर्थाने आजच्या परिभाषेत बोलायचं तर, 'कंत्राटी-पद्धतीचं निर्मूलन करत, कंत्राटी-कामगारांना शिवछत्रपतींनी नोकरीत 'कायम' केलं.''

तसंच, राज्यघटनेनं सामाजिक-आर्थिक न्यायासाठी देशाला एक प्रारुप (Model) पुरवलं; पण, त्यातून आपसूक 'समतेचा-समरसतेचा संदेश' व्यवहारात उतरणारा नव्हता...वर्ष-१९७७च्या ४४व्या घटनादुरुस्तीपर्यंत संपत्तीचा अधिकार 'मूलभूत-अधिकार' असणं किंवा युनोने (णछज) वर्ष-२०१५मध्ये जाहीर केलेल्या शाश्वत विकास ध्येयांमध्ये (Sustainable Development Goals...SDGs) समाविष्ट केलेल्या ''आर्थिक-विकास सर्वांचा (Shared or Common Prosperity)'' थासंदर्भात मार्गदर्शक-सुत्रांव्यतिरिक्त कुठलीही ठाशीव वा 'परिणामकारक तरतूद' नसणं... 'आर्थिक-विषमते'वरील (Income-Disparity) प्रभावी उपाययोजनांबाबत अथवा तसे दंडक घालण्याबाबत 'राज्यघटना' बव्हंशी मौन असणं...याचाच सरळ अर्थ, 'महामानवा'ला त्याच्या इच्छेनुरुप व त्याच्या 'समतेच्या संदेशा'ला स्मरुन 'राज्यघटना' लिहू देण्याचं, परिपूर्ण स्वातंत्र्य न दिलं गेल्याचं ते द्योतक होय!

'भांडवलशाहीची मक्का' म्हणवल्या जाणाऱ्या ज्या अमेरिकेत, टेस्लाच्या इलिऑन मस्कला, उद्दिष्टपूर्तीपश्चात १ ट्रिल्यन-डॉलरचा बोनस मिळू शकण्याची घोषणा होते व जो बोनस, जगातल्या दिडशेहून अधिक देशांच्या राष्ट्रीय-ढोबळ उत्पन्नाहून (GDP) जास्त असणार आहे...तिथेदेखील, आजच्या घडीला, ''श्रीमंतीची उच्चतम रेषा निर्धारित करण्याची'' जोरदार मागणी होतेय.

...आणि, आम्ही पाचसहा हजार कोटींची अंबानीसारख्या उद्योगपतींची घरं आणि त्याहीपेक्षा खर्चिक, त्यांच्या घरच्या शाही लग्नसोहळ्यांची कौतुकं घालताना थकत नाही. चॉईस दिला तर, कोंबडी-कुत्रीदेखील रहाणार नाहीत; अशा शहरं-उपनगरांतल्या दाटीवाटीच्या नगरांमधल्या १०' X १०' मध्ये, 'कोंडलेले श्वास' घेऊन जगणारे 'भांडवली-व्यवस्थेकडून धुत्कारलेले अभागी जीव...हे देशातल्या 'कंत्राटी-कामगार पद्धती'चे, 'आऊटसोर्सिंग'चे अपत्य असतानाच; देशात श्रमिकवर्गाचं 'माणूसपण' नाकारणाऱ्या 'काळ्या कामगार-संहिता' (Black Labour-Codes) येतात; याचा नेमका अर्थ काय?

...जर, काळाची रेषा ७० वर्षे पुढे वाढवून आपण पाहिली आणि त्यातून, आज बाबासाहेब हयात असते; अशी कल्पना केली...तर, कुणाची बिशाद होती, असा आर्थिक-विषमतेचा नंगानाच, या देशात घालण्याची?

...त्यामुळेच, निव्वळ राज्यघटनेचं कौतुक करत रहाण्यापेक्षा अथवा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुण्यस्मरणाच्या सोहळ्यांचं अवडंबर माजवण्यापेक्षा... ''त्यांचा आर्थिक-समतेचा संदेश व्यवहारात उतवण्यासाठी राजकीयदृष्ट्या कार्यरत रहाणं, सद्यस्थितीत अत्यावश्यक आहे.''

...एकदा हे ध्यानात घेतलं की, लागलीच आपल्या खांद्यावरची जबाबदारी खूप वाढते आणि म्हणूनच, बाबासाहेबांचे सच्चे अनुयायी या नात्याने आम्ही, यथाशक्ती 'धर्मराज्य पक्षा'च्या व्यासपीठावरुन, अखेरच्या श्वासापर्यंत तसं कार्यरत रहाण्याची प्रतिज्ञा... आजच्या 'महापरिनिर्वाण दिना'निमित्ताने करीत आहोत... जय भीम!

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

## 'एपस्टिन फाईल्स'च्या निमित्ताने....

...पृष्ठ क्र. १२ वरुन

व 'आयटी'सारख्या सेवा-उद्योगात सुरु आहेत; पण, तरीही 'कॉर्पोरेटीय-शांति'चा सन्नाटा पसरलेला आहे तिथे! ही कुठल्याही प्रार्थनास्थळीची पवित्र-शांतता नव्हे; ती आहे, स्मशानातल्या मुडद्याफरासांची अपवित्र-निर्जीव शांतता...पण, कमांडोज अथवा सशस्त्र बाऊन्सर्स ठेऊन 'कंपनी-दहशतवाद' (Corporate-Terrorism) पसरवत पिडीतांचा आवाज-आक्रोश दडपण्यातूनच तिची आजवर जडणघडण झालीय...आयटी-उद्योग वा इतर औद्योगिक-विश्वातल्या अशा 'एपस्टिन-फाईल्स'सदृश रोज घडणाऱ्या घटना टाळायच्या; तर, कामाच्या ठिकाणी 'लोकशाही' (Democracy At WorkPlace) हवी...कामाच्या ठिकाणी व्यवस्थापकीय मंडळींना जरब बसेल; असे पाश्चात्य धर्तीचे कडक कामगार-कायदे हवेत... आणि, आपल्याकडे तर, कामगार-कर्मचाऱ्यांचं व त्यांच्या संघटनांचं सबलीकरण-सक्षमीकरण करण्यासंदर्भात ''षंढ नवरा कुंकवाला आधार'' म्हणून असलेले कामचलाऊ व तकलादू कामगार-कायदे देखील बदलले जाऊन...परिपूर्ण व अखंड 'गुलामी' लादणारे ४ काळे कामगार-कायदे (Black Labour-Codes) आणले गेलेत...आणि, त्याद्वारे, औद्योगिक-सेवा क्षेत्रातील 'एपस्टिन-फाईल्स' कायमच्या बंद राखण्याची तरतूद भाजप-संघीय सरकारकडून केली गेलीय...

...तेव्हा, फक्त, 'पगार आणि बोनस वाढ' एवढ्याच त्रोटक भूमिकेतून 'कामगार-चळवळी'कडे पहाणाऱ्या कामगार-कर्मचाऱ्यांनो, सावध होऊन काळाच्या हाका वेळीच ऐका, धन्यवाद!

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# मार्क्सवाद : एक स्वतंत्र आकलनाचा विषय

''Accumulation of wealth at one pole is at the same time accumulation of misery, agony of toil, slavery, ignorance brutality, mental delegation, at the opposite pole!"...इति, कार्ल मार्क्स

प्रचलित हेगेलियन-दैववादाला ठोकरुन भौतिक-जगताला, त्याचं वास्तविक अधिष्ठान मिळवून देताना...आपल्या कल्पना-संकल्पना-आपले विचार, हे अवतीभवती घडणाऱ्या व घडून गेलेल्या घटनांचा परिपाक असतो आणि त्यांची पैदास-उगवण आपल्या हाडामांसातूनच होत असते. आपल्या आजच्या परिस्थितीला ईश्वरासारखी कुठली सर्वव्यापी-सर्वसाक्षी-सर्वशक्तिमान पारलौकिक शक्ति जबाबदार नसून; आपण स्वतःच त्याला जबाबदार असतो, हे मार्क्स ठणकावून सांगू लागला व ती परिस्थिति बदलण्याचं क्रांतिकारी आवाहन तो ठायी ठायी करु लागला.

'Classless Stateless Society' या साम्यवादी-संरचनेचं (Communism) स्वप्न पहाणाऱ्या कार्ल मार्क्सला...'शासकीय-भांडवलवाद' (स्टेट-कॅपिटॅलिझम), या संकल्पनेची परिपूर्ण मांडणी करण्याएवढा वेळ नियतीनं दिला नाही; त्यामुळे, ''भांडवलशाहीतून समाजवाद, समाजवादातून साम्यवाद''...अवतरण्याच्या स्थित्यंतराच्या कालखंडात, लयाला जाऊ पहाणाऱ्या (State shall wither away) 'राज्यशासनाची औटघटकेची भूमिका' ठरवणं व ठरवल्या भूमिकेची संगतवार मांडणी करण्याचं अवघड शल्यकर्म पार पाडण्यापूर्वीच... व्याधिग्रस्त समाजपुरुषाच्या देहावर शस्त्रक्रिया करु पहाणारा महान 'शल्यविशारद', कामाच्या प्रचंड तणावाने स्वतःच व्याधिग्रस्त होत...काळाच्या पडद्याआड गेला, हे अखिल मानवजातीचं मोठं दुर्दैवच! त्यामुळे 'मार्क्सवाद', हा मोनालिसाच्या चित्रासारखा, मार्क्सवाद राबवणाऱ्या सत्ताधारी व्यक्तीगणिक, एक स्वतंत्र आकलनाचा विषय काहीसा बनला.

मूलतः 'भांडवलशाही व लोकशाही', या परस्परविरोधी संकल्पना असताना, मार्क्सवादाच्या विभिन्न आकलनातून ''स्टॅलिन-माओच्या कालखंडात झालेल्या दुर्दैवी रक्तपाताला व कम्युनिस्टांच्या झेंड्यातील लाल रंगाला'', एकाच नाण्याच्या दोन बाजू कल्पून भांडवली-व्यवस्थेनं... 'समाजवाद-साम्यवादा'ला जगभरात केवळ नाहक बदनामच केलं नाही; तर, त्याविषयी एक मोठी भ्रामक-दहशत निर्माण करुन (विशेषतः, महाराष्ट्रात कम्युनिस्टांना 'लाल माकडं' संबोधून व कृष्णा देसाईंसारख्या कम्युनिस्ट नेत्यांच्या हत्या घडवून) 'साम्यवादा'ला जनसामान्यांच्या विचारविश्वातून बाद करण्याचं महापातक केलं...त्यातूनच, कामगार-क्रांतिमैदान असलेली 'लालबाग', कधि 'दलालबाग' बनली, कुणाला कळलंदेखील नाही!

जगभरातील भांडवली-व्यवस्थेची, विशेषतः अमेरिकन भांडवली-व्यवस्थेची 'असलियत' उघडी पडणं....

शीतयुद्धाच्या कालखंडात अमेरिका, इंग्लंड, युरोपमधील अनेक भांडवली-देश, साम्यवादी (कम्युनिस्ट) देशांमध्ये मानवी-हक्कांना पायदळी तुडवलं जात असल्याबाबत व 'पोलादी-पडद्या'आडच्या (Iron Curtain) हुकूमशाही-कारभाराबाबत, कायमच कोल्हेकुई करत आलेली होती... पण, वर्ष-१९९१मध्ये 'सोव्हिएत युनियन' कोसळल्यानंतर (ज्याला, रशियन अध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांनी, ''The greatest geopolitical catastrophe of the 20th century'' असं संबोधलंय) व डेंग झिओपिंग यांच्या नेतृत्त्वाखाली चीनने भांडवली-अर्थसुधारणा (Economic-Reforms with Chinese characteristics) हाती घेतल्यानंतर... जगभरातलं साम्यवादाचं (कम्युनिझमच) जणू आव्हानच संपुष्टात आलं... आणि, त्यानंतरच प्रकर्षाने अमेरिकन भांडवली-व्यवस्थेचा 'लोकशाहीविरोधी' असा भेसूर, हिंसक खराखुरा चेहरा जगाला दिसू लागला! दररोज १२० या हिशोबाने ४३,३७५ अमेरिकन माणसं, दरवर्षी बंदुकीच्या गोळीबारात मारली जातायत...तरीही, अनिर्बंध बंदुकीच्या वापरावर कडक निर्बंध घालण्याची, कुणाही एका अमेरिकन अध्यक्षाची हिंमत होऊच शकत नाही; एवढी, 'भांडवलदार' अमेरिकेतल्या 'भांडवली-व्यवस्थे'तील बंदूक-उत्पादकांची संघटना शक्तिशाली आहे.



अमेरिकेतील शस्त्रास्त्र-निर्मिती करणारे लॉकहिड-मार्टिन, रेथॉन टेक्नॉलॉजिज, बोईंग सारखे बडे बडे कारखाने चालावेत म्हणूनच, जगातली युद्धे कधिच थांबू शकत नाहीत...कारण, वेळोवेळी ढासळणारी अमेरिकन-अर्थव्यवस्था सावरुन धरण्याचं तथाकथित 'महत्कार्य', याच शस्त्रास्त्रनिर्मिती करणाऱ्या कंपन्या, परंपरागतरित्या करत आलेल्या आहेत. अफगाणिस्तान, इराक आणि लिबियामधील रक्तरंजित अमेरिकन लष्करी-हस्तक्षेप, हा 'युनो'च्या सुरक्षा-परिषदेच्या संमतीविना किंवा जसं लिबियात घडलं तसं, म्हणजे...युनोच्या ठरावाचा विकृत अथवा सोयिस्कर अर्थ लावूनच झाला होता. गाझातल्या नरसंहाराच्या रुपाने... जगातील लोकशाही व मानवी-हक्कांच्या संरक्षणाचा खोटा मुखवटा धारण करणाऱ्या, तमाम अमेरिकन भांडवली-व्यवस्थेचा आत्यंतिक क्रूर, हिडीस व अमानुष चेहरा नव्याने जगासमोर आलाय, इतकंच! ''भांडवलाच्या डोक्यापासून पायापर्यंत प्रत्येक छिद्रातून रक्त आणि घाण टपकत असते'', या मार्क्सच्या वक्तव्याचा जिवंत प्रत्यय, वरील घटनाक्रमातून आल्याशिवाय रहात नाही.

...केवळ स्टॅलिन, माओ यांनी केलेल्या अत्याचारांमुळे व हुकूमशाही कारभारामुळे 'साम्यवाद-समाजवाद', हे मलिन होऊच शकत नाहीत; कारण, 'लोकशाही आणि समाजवाद-साम्यवाद' एकत्रित गुण्यागोविंदाने कसं नांदतात...याचं प्रत्यंतर वर्ष-१८७१मधील 'पॅरिस-कम्यून'च्या ऐतिहासिक प्रयोगात जगासमोर आलंच होतं; पण, गुन्हेगारी-संगनमत करुन नृशंस भांडवली-व्यवस्थेनं...जवळपास २० हजाराहून अधिक निष्पाप समाजवादी-क्रांतिकारकांच्या रक्ताचे पाट वाहते करुन, तो प्रयोग अमानुष क्रौर्याने मोडून काढला आणि त्यानंतर आजतागायत, तो 'लोकशाही-समाजवादा'चा (Democratic Socialism) कमालीचा यशस्वी प्रयोग इतिहासाच्या कृष्णविवरात कायमचा दडपून टाकलाय! स्टॅलिन, माओ वगैरेंच्या दडपशाही, हुकूमशाहीतील हिंसाचारासंदर्भात (इथे सुद्धा, तत्कालीन कुठल्या जंगली परिस्थितीशी व कुठल्या अमानुष व्यवस्थेविरुद्ध स्टॅलिन, माओ लढत होते...याचाही, साकल्याने विचार व्हायला हवाच) कार्ल मार्क्सच्या 'साम्यवादा'ला (Communism) जबाबदार धरणे; म्हणजे, चर्चमधल्या अत्याचारांसाठी जीझस ख्रिस्तला किंवा मुस्लिम अतिरेक्यांच्या हिंसक कारवायांसाठी महंमद पैगंबरांना जबाबदार धरणे होय...एवढंच नव्हे तर, जपानवर टाकल्या गेलेल्या अणुबॉम्बसाठी वा आजच्या जगातल्या विनाशकारी आण्विक-शस्त्रसज्जतेसाठी आईनस्टाईनला जबाबदार धरण्यासारखं आहे...किंवा, भारतीय-राजकारणाच्या सद्यस्थितीला धरुन बोलायचं तर, आपल्या देशाच्या आताच्या अस्थिर व ढासळत्या आर्थिक-राजकीय परिस्थितीला, भाजप-संघीय राज्यकर्त्यांसारखं म. गांधी व पं. जवाहरलाल नेहरुंना जबाबदार धरण्यासारखं हास्यास्पद आहे...एकूणच, हे 'साप समजून भुई धोपटणं' आहे, एवढं निश्चित.

### साम्यवादाचा ऐतिहासिक धांडोळा व इतिहासाचं डोळस अवलोकन....

'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो'मध्ये मांडलेल्या ''उत्पादनाच्या संसाधनांची व उत्पादनांची सामूहिक मालकी'', वगैरे संकल्पना मानवजातीला अगदीच नव्या नव्हत्या! आपल्या तत्त्वप्रणालीसाठी प्राणार्पण करणाऱ्या

थॉमस मूर यांनी वर्ष-१५१६ मध्ये लिहीलेल्या 'युटोपिया' ग्रंथात एक बेटावर 'कम्यून' स्थापण्यात आल्याचा विचार मांडला होता; ज्यातील, सगळेच व्यवहार तार्किकदृष्ट्या व न्याय्य पद्धतीने पार पाडले जात होते. १६६७मध्ये जॉन मिल्टन याने अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांतिला प्रेरणा देणाऱ्या 'पॅराडाईज लॉस्ट' या गाजलेल्या प्रदीर्घ काव्यात राजेशाहीला विरोध करत, अशाच स्वरुपाच्या नागरी-हक्क समानतेची व प्रजासत्ताक संकल्पनांची मांडणी केली होती...आणि, त्याहीपूर्वी इसवीसनपूर्व चौथ्या शतकात प्लेटोने (भले राज्यकर्त्यावर्गापुरती का असेना); समाजहित साधण्यासाठी अडसर ठरणाऱ्या राज्यकर्त्यांच्या स्वार्थप्रेरणा व भ्रष्टाचार मुळातूनच निपटून काढण्याकामी......पृष्ठ क्र. १५ वर

# मार्क्सवाद : एक स्वतंत्र आकलनाचा विषय ...पृष्ठ क्र. १४ वरुन

त्यांच्यासाठी खास खाजगी-मालमत्ता, विवाहसंस्था मोडीत काढणारी 'कम्यून्स' (Precurser to communism) स्थापण्याची संकल्पना मांडली होती.

प्रत्येक युद्धात मोठ्या संख्येनं भाग घेणाऱ्या रयतेच्या, युद्धात भाग घेण्याच्या प्रेरणांचं प्रथमच मार्क्सने खोलवर अध्ययन केलं व त्यातूनच इतिहास, **हा निव्वळ विभिन्न राज्यांच्या, राजेरजवाड्यांच्या वा भिन्नभिन्न धर्मांच्या संघर्षांतून घडलेला नसून...तो विविध आर्थिकवर्गांच्या संघर्षांतून घडला असल्याचं प्रतिपादन केलं.**

**डम स्मिथ आणि नवउदारमतवादी मंडळी....**

अमेरिकेला स्वातंत्र्य मिळत असतानाच वर्ष १७७६ डम स्मिथचं ''Wealth Of Nations'' पुस्तक प्रकाशित झालं...'व्यक्तिगत स्वार्थ साधणं' वा 'बाजारपेठेतील 'अदृश्य हात' वगैरे संकल्पना, भांडवली-व्यवस्थेत समाजाचं आर्थिक-उन्नयन करतील...असं जरी डम स्मिथने म्हटलं असलं; तरी, त्याने भांडवलदार अथवा बडे उद्योग-व्यावसायिक जेव्हा एकत्र येतात, तेव्हा ते काही समाजाच्या भल्याची चर्चा करण्यासाठी एकत्र येत नाहीत; तर, आपला स्वार्थ साधण्यासाठी व तो साधताना समाजाच्या हिताविरुद्ध कटकारस्थानं रचण्यासाठीच एकत्र येत असतात'', हे 'वैश्विक-सत्य' मुद्दाम नमूद करुन ठेवलंय.

डम स्मिथला भांडवली मक्तेदारीतून निर्माण होऊ शकणाऱ्या बाजारपेठीय निखळ स्पर्धेतील मोठ्या 'अवरोधा'ची (nti-Competitiveness) परिपूर्ण कल्पना होती. कामगारांच्या हितासाठीच केवळ, बाजारपेठेवर सरकारी-नियंत्रणाच्या (Regulation) बाजुने तो होता; तसेच, हे सरकारी-नियंत्रण भांडवलदारवर्गाच्या बाजुने बिलकूल असू नये, एवढंच म्हणून डम स्मिथ थांबला नाही; तर, ''पडद्यामागे सगळी कॉर्पोरेटीय-मंडळी, सर्वत्र कामगारांचे वेतन-पगार कमीतकमी राखण्यासाठी लपूनछपून कट रचत असतात'', असा कामगारहिताच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर इशाराही देऊन गेला. अमेरिकेचंच उदाहरण द्यायचं झालं तर, डम स्मिथच्या या प्रतिपादनानंतर जवळपास २०० वर्षानंतरचं हे चित्र होतं की, ''हॉलिवूड आणि सिलिकॉन व्हॅलीतील बडे उद्योगपती एकत्रित येऊन, जे कामगार-कर्मचारी त्यांच्या झोळीत बेफाम नफ्याच्या ओंजळी सतत ओतत होते; त्यांच्याच वेतन-सोयीसुविधांचं खच्चीकरण करण्याच्या योजना आखत होते''.

याचाच सरळ अर्थ हा की, ''अगदी भांडवलशाहीचा उद्गाता असलेला डम स्मिथदेखील आपलं वेतनमान-सोयीसुविधा वाढवण्यासाठी व कामगारहक्कांसाठी कामगार-चळवळीचा बाजुने उभा होता; तसेच, कामगार-चळवळीचा खंदा समर्थक होता...आणि, 'अनियंत्रित-भांडवलशाही'च्या (Unfetterd Capatalism... Neo-Liberalism type) सक्त विरोधात होता! एवढंच नव्हे तर, तो शिक्षण-आरोग्य या जीवनावश्यक क्षेत्रांवर 'सार्वजनिक-मालकी' हवी; तसेच, सरकारनेही उद्योगधंद्यात समाजहितासाठी गुंतवणूक (Public Investment) करायला हवी, अशा मताचा होता. ''लोकसंख्या नियंत्रित राहिली नाही; तर अधिक पैदा झालेल्या मुलांना खायला अन्न मिळणार नाही आणि यालाच जीवन ऐसे नाव आहे'', असं संवेदनशून्य वक्तव्य करणाऱ्या थॉमस माल्थसपेक्षा डम स्मिथ कितीतरी अधिक समंजस व सखोल विचारवंत वाटतो, तो त्यामुळेच! म्हणूनच, जोसेफ स्टिग्लिट्झ एका मुलाखतीत म्हणाले, ''डम स्मिथला जर, 'जिमी कार्टर, रोनाल्ड रिगन, मार्गारेट थॅचर, मिल्टन फ्रिडमन वा फ्रेडरिक हायेक वगैरे नवउदारमतवादी लोकं (Neo-Liberals)...जगभर आपली नवउदारमतवादी-विचारसरणी लादण्यासाठी, त्याचा कसा वेडावाकडा वापर करतायत, हे कधि कळलं असतं...तर डम स्मिथ, त्यांच्या क्रूर-विकृत विचारसरणीच्या खंडनासाठी व त्यांना उघडं पाडण्यासाठी आपल्या कबरीतून उसळून ताठ उभा राहिला असता!

**भांडवलशाहीची उगमाकडून अधःपतनाकडे वाटचाल....**

पंधराव्या शतकातील पोर्तुगीजांच्या 'मदीरा' बेटावरील जंगलं जाळून साखर-निर्मितीतून सुरु झालेला भांडवली-व्यवस्थेचा आदिम प्रवास, नवनव्या शास्त्रीय संशोधनातून अठराव्या शतकानंतर अवघ्या तीन शतकातच अधिक प्रगत, व्यापकच नव्हे; तर, संवेदनशून्य-नृशंस होऊ लागला! फरक एवढाच की, त्या क्रौर्य-अमानुषतेला भांडवली प्रचारकी धाटणीचं पांढरपेशी-दांभिक गोंडस-आवरण प्राप्त झालं होतं. शास्त्रीय संशोधनाच्या कल्लोळातून उभ्या रहात असलेल्या भांडवली-व्यवस्थेची 'व्याप्ती' एवढी मोठी व सर्वंकष होत गेली की, तिनं ''पैसा, हा 'नवा परमेश्वर' जन्माला घातला'' ...आणि, त्यातून सामाजिक-नीतिमत्ता झपाट्याने काढता पाय घेऊ लागली. माणसं, अधिकाधिक 'आत्मकेंद्रित' बनू लागली...अशा आत्यंतिक स्वार्थ-संवेदनशून्यतेला 'व्यावसायिकता' (Professionalism) हे संबोधन प्राप्त झालं व अवघं मानवी-जगणं, एका दिशाहिन-अंतहिन आवर्तात सापडलं.

औद्योगिक-क्रांतिला सुरुवात झाल्यानंतर, ती 'आर्थिक-विषमते'ची जननी ठरणार, हे समाजधुरिणांच्या ध्यानात आलं होतंच. भांडवलदारवर्ग, नफ्याचा मोठा हिस्सा स्वतःकडे ठेऊन कामगार-कर्मचाऱ्यांचं अतोनात शोषण करणार आणि त्याचं समर्थन करण्यासाठी वेगवेगळी मिथकं रचणार अथवा प्रतिपादनं करणार (उदा. भांडवलदार खूप कष्ट घेतात, धोके पत्करतात, नव्याचा शोध घेतात, नफ्यातून गुंतवणूक करुन राष्ट्रीय-समृद्धीत भर घालत रहातात व रोजगारनिर्मिती करतात; तसेच, 'भांडवली-व्यवस्था' ही इतर कुठल्याही व्यवस्थेपेक्षा अधिक सक्षम व उत्पादक असते म्हणून, भांडवलशाहीत समाजात निर्माण होणारी 'आर्थिक-विषमता' ही योग्यच होय वगैरे वगैरे), हे ही सगळ्यांच्या ध्यानात आलं होतं. त्यामुळे, भांडवलदारवर्गाने नफा कमावणं आणि केवळ कमावणंच नव्हे; तर, कितीही आणि कसाही कमावणे...या अनैतिक व समाजघातकी विचारसरणीला, अशातऱ्हेनं 'नैतिक-अधिष्ठान' देण्याचा (जसा तो विशेषत्वाने, १९७०-८०च्या दशकात 'रिगन-थॅचर'कृत 'नवउदारमतवादी-विचारसरणी पसरवताना केला गेला) निरंतर केविलवाणा प्रयत्न भांडवलदार करत राहिले... त्याविरोधात, ठामपणे उभा रहात कार्ल मार्क्सने ''भांडवलशाहीत कामगारांच्या असहाय्य स्थितीचा व त्यांच्या स्खलनशीलतेचा गैरफायदा घेऊन त्यांचं अमानुष शोषण केलं जातं आणि ती पुढे जाऊन स्वतःतल्या अंतर्विरोधातूनच कोसळून पडेल'', असं भांडवली-कालचक्राला आव्हान देणारं सप्रमाण प्रतिपादन केलं.

**'रिगन-थॅचर'प्रणित तथाकथित 'उदारमतवादी-विचारसरणी'** (Neo-Liberalism) **आणि अमानुषतेचा व आर्थिक-विषमतेचा कहर....**

अमेरिकन अध्यक्ष जेम्स मोन्रो यांनी वर्ष-१८२३मध्ये अंगिकारलेल्या नृशंस परदेशनीतिनुसार, ज्याला 'मोन्रो-तत्त्वप्रणाली' (Monroe Doctrine) म्हटलं जातं, अमेरिकेची भौगोलिक हद्द जशी थेट पॅसिफिक महासागरापर्यंत विस्तारली...तसाच, या १९७०नंतरच्या नवउदारमतवादी (Neo-Liberal) कालखंडात अमेरिकन कंपन्या जगभर आपले हातपाय पसरु लागल्या...त्यांच्या नवउदारमतवादी 'बंधमुक्त' उद्योग-व्यवसायासाठी जणू जग हे एक 'जागतिक-खेडं'च (Global-Village) बनलं, असंच नव्हे; तर, कॉर्पोरेटीय-वर्चस्ववादी नृशंस खेळ खेळण्यासाठी एक आंगण (Corporate-Courtyard) बनलं... आणि, 'मोन्रो-तत्त्वप्रणाली'नुसार भौगोलिक-विस्तार करताना, स्थानिक-जमातींची सामूहिक हत्याकांड वा नरसंहार घडवण्यासारखं जे भयंकर क्रौर्य दाखवण्यात आलं; तोच गर्हणीय प्रकार, नवउदारमतवादी-विचारसरणीअंतर्गत 'खाउजा' धोरण (खाजगीकरण-उदारीकरण-जागतिकीकरण) जगभरातल्या कामगारविश्वात राबवताना कॉर्पोरेटीय-जगतानं अवलंबला...फक्त, या कॉर्पोरेटीय-प्रयोगात थेट जनतेच्या नजरेसमोर जरी रक्ताचे पाट वाहिले नाहीत; तरी, चिलीसारख्या अनेक देशांतील लोकनियुक्त राष्ट्रप्रमुखांच्या CI कडून लष्करी-कटकारस्थानं करुन हत्या केल्या गेल्या, जाज्वल्य कामगार-नेत्यांचे व डाव्या विचारसरणीच्या लोकांचे सर्रास मुडदे पाडले गेले आणि श्रमिकवर्गाच्या रक्ताचा घाम आणि साध्या पाण्याचा दाम...यातला फरक 'स्वस्त-मजुरी'ने पुसून टाकला!

याच संदर्भात, ''When the rich rob the poor, it's called business. When the poor fight back, it's called violence,'' हे मार्क ट्वेनचे प्रत्ययकारी उद्गार समजून घेणं आवश्यकच.

''माणसाने उभारलेल्या व्यवस्था किती ठिसूळ, तकलादू असू शकतात; हे आपल्याला करोना-काळाने दाखवल्यानंतर एक गोष्ट निश्चित झालीय की, बाजारपेठीय-व्यवस्थेला अनिर्बंध स्वातंत्र्य बहाल करुन सगळ्या मानवी-समस्या सुटणार नाहीत. अर्थव्यवस्थेच्या इशाऱ्याला भीक न घालणारी, एक 'राजकीय-प्रणाली' उभी करणंच केवळ नव्हे; तर, मानवी जगण्यातला सन्मान-सुरक्षा पुन्हा एकवार मध्यवर्ती स्थानी प्रस्थापित करुन, त्या आधारस्तंभावरच आपल्याला हवी असलेली नवी पर्यायी सामाजिक-व्यवस्था निर्माण करावी लागेल'', हे तेव्हाचं पोप फ्रान्सिस यांचं प्रतिपादन, यासंदर्भात बरंच काही सांगून जातं.

अनेक देशांच्या राष्ट्रीय-ढोबळ उत्पन्नापेक्षा मोठी वार्षिक-उलाढाल असणाऱ्या महाकाय बहुराष्ट्रीय कंपन्या व त्यांच्या राक्षसी-सैतानी कॉर्पोरेटीय-ताकदीचा प्रतिकार....

बाजारपेठीय प्रचंड शक्तिशाली भांडवली-व्यवस्थेविरोधातील प्रतिकार आणि त्या प्रतिकाराचं यश, तेव्हाच सुनिश्चित होऊ शकतं; जेव्हा, तळागाळातील पिडीत-शोषित समाजातील प्रत्येक व्यक्ति 'जाणकार' होऊ लागते, जागी होऊ लागते... ज्याला, कार्ल मार्क्स 'वर्ग-जाणीव' (Class-Consciousness) निर्माण होणं म्हणतो आणि कामगारांना अनेक प्रसंगी होणाऱ्या आपल्याच 'वर्गहिता'विरोधातील चुकीच्या अथवा विपरीत वर्गजाणिवेविषयीही (False Consciousness) मार्क्स आपल्याला सावध करतो. **(क्रमशः)**

# राजन राजे यांचे महामानवाला अभिवादन



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७०व्या महपरिनिर्वाणदिनाच्या पूर्वसंध्येला, दि. ५ डिसेंबर-२०२५ रोजी, रात्रौ ११ वाजताच्या सुमारास ठाणे शहरातील पंचगंगा सोसायटी-राबोडी येथील 'संजीवनी बहुउद्देशीय प्रतिष्ठान' यांच्या वतीने आणि त्यानंतर कोर्टनाका येथे, आंबेडकरी-नेते सुनील खांबे यांनी आयोजित केलेल्या, महपरिनिर्वाणदिनाच्या कार्यक्रमानिमित्त महामानवास अभिवादन करण्यात आले. या दोन्ही कार्यक्रमांस 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष तथा ज्येष्ठ कामगार-नेते मा. राजन राजे यांनी उपस्थित राहुन, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पवित्रस्मृतींस विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी पक्षाचे प्रवक्ते समीर चव्हाण उपस्थित होते. यावेळी उपस्थित भीमसैनिकांना संबोधित करताना मा. राजन राजे म्हणाले की, ''आजच्या महपरिनिर्वाणदिनी बाबासाहेबांना 'राज्यघटनेचे शिल्पकार' या भूमिकेच्या पलीकडे जाऊन, 'समतेच्या संदेशा'तून 'सामाजिक व आर्थिक' न्याय देऊ पहाणारा 'महामानव' म्हणून पहाणे अधिक गरजेचं असून, 'राज्यघटनेचे शिल्पकार' किंवा 'दलितांचा मसीहा' या तुलनात्मकदृष्ट्या काहीशा मर्यादित भूमिकेत त्यांना पहाणं म्हणजे, 'कोहिनूर हिऱ्या'ला अंगठीत कोंडून टाकण्यासारखे आहे. शिवछत्रपती असोत वा बाबासाहेब असोत, त्यांचा प्रामुख्याने भर, संपूर्ण समाजाचं 'आर्थिक-उन्नयन' करण्यावर व तळागाळातील समाजघटकांसाठी, शक्य तेवढं सन्मानजनक जीवनमान निश्चित करण्यावर होता. 'तलवारधारी' शिवछत्रपतींपेक्षा, 'नांगरधारी' शिवछत्रपती जे, न्याय-समतापूर्ण प्रशासकीय व्यवस्था लावणारे होते. हे जेवढे महात्त्वाचे; तितकेच, 'राज्यघटना' हाती घेतलेल्या बाबासाहेबांपेक्षाही, 'समतेचा संदेश' देणारे बाबासाहेब जनसामान्यांसाठी अधिक महात्त्वाचे आहेत!'' अशा शब्दांत त्यांनी आपल्या परखड भावना व्यक्त केल्या. यावेळी आपल्या भाषणात मा. राजन राजे यांनी, कंत्राटी-कामगार पद्धत व केंद्र सरकारने लागू केलेल्या 'काळ्या-कामगार संहिते'वर एकच शरसंधान साधून, कामगारद्रोही भाजप सरकार आणि भांडवलधारी प्रस्थापित व्यवस्थेवर सडकून टीका केली. या अभिवादन कार्यक्रमाला पंचगंगा-राबोडी परिसरातील शेकडो आंबेडकरी अनुयायी तसेच, कोर्टनाका येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णकृती पुतळ्याजवळ मोठ्यासंख्येने भीमसैनिक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन आंबेडकरी चळवळीतील नेते सुनील खांबे आणि संदीप खांबे यांनी केले होते.

# कर्तव्यपथावर हत्या झाल्यावर

त्यांचा आत्मा विखरून
कोट्यवधी हृदयांची धडधड बनला
शोक ओसरल्यावर काही लोकांनी
त्यांचा चष्मा, काठी, कमरेवर लटकणारे घड्याळ, झिजलेल्या चपला वगैरे वस्तू
आठवण म्हणून अनेक वर्षे जतन केल्या
अगदी कालपर्यंत जशाच्या तशा जपून ठेवल्या होत्या
नंतर काही लोक असे आले की
त्यांचा प्रथम नैतिक पाठिंबा वधकर्त्याला होता
परंतु कालांतराने महात्म्याला त्यांनी प्रात:स्मरणीय बनवले
या अतिशय हुशार लोकांनी पुढचा अधिक, खोल आणि द्रष्टा विचार केला
की
नॉस्टॅल्जीया नको उगाच
आणि दुसरे म्हणजे वस्तू ठेवून ठेवून निकामी होतील
म्हणून त्यांनी त्या विकसित केल्या
वापरात देखील आणल्या
म्हणजे असे...
महात्म्याच्या चष्म्याची फ्रेम बदलली
ती पोलादी करुन
तुटक्या काचा बदलून
तिथे अश्रुधुराच्या कांड्या बसवल्या
उपयोगी पडल्या
लाखो आंदोलनजिवींच्या डोळ्यातून पाणी काढले
ते पाणी रस्त्यावर ठोकलेल्या खिळ्यांना घातले
खिळे वाढविले...
कोणीतरी महात्म्याचा पंचा पैदा केला
तो त्यांनी भगवा केला
पंच्यावर सोन्याच्या धाग्यांनी लाखो वेळा स्वत:चेच नाव विणून घेतले
आणि तो पूज्य भावनेने स्वतः पांघरला
अखिल जगाला भगव्या खादीचे जरतारी महत्त्व दाखवून दिले
काठीची रायफल केली
तिला चकचकीत धारदार संगीन बसवली
शेतकरी, कामगार, विद्यार्थी यांच्यावर रोखली
खूप वापरली
दसऱ्याच्या दिवशी तिची यथासांग पूजाही केली
महात्म्याच्या छातीतली गोळीही कुठून तरी शोधून काढली
गोठलेले हृदयरक्त साफसूफ करुन ती रायफलीत घालून सज्ज ठेवली
वेळोवेळी उपयोगात आणली
स्तब्ध झालेल्या त्यांच्या घड्याळाचे काटे
मागे मागे फिरवले
इतिहासाचे नायक बदलून टाकले
नावे बदलली
काही गाळून टाकली...
महात्म्याच्या झिजलेल्या चपलांना
अणकुचीदार खिळे ठोकून
त्यांचे हजारो मजबूत पोलीसबूट बनवले
नव्या विकास मार्गात आडवे येणाऱ्यांना पायदळी तुडवले
आठ आठ पदरी विकास केला
आता त्यांनी संचलन सुरू केले आहे
एमजी रोड वर कर्फ्यू लागलेला आहे....

***मोहन देस***

## उडाला तो पक्षी आणि बुडाला तो रुपया....

वर्ष-२०१४मध्ये मोदी सत्तेवर आल्यापासून एका वर्षातच डॉलरचा दर ६० रुपयावरुन एकदम ६७ रुपयावर पोहोचला...२० ऑगस्ट-२०१५ला, 'धर्मराज्य पक्षा'च्या ठाण्यातील काशिनाथ घाणेकर सभागृहात झालेल्या एका सोहळ्यात भाषण करताना मी म्हटलं होतं की, ''नरेंद्र मोदींची त्यांच्या गुजू-दोस्तांच्या हितासाठीच केवळ राबवलेली; पण, देशाच्या आम जनतेच्या दृष्टिकोनातून 'आत्मघातकी' ('आत्मनिर्भर' नव्हेच) असलेली आर्थिक-धोरणे पहाता...भारतीय रुपया त्यांच्या कारकिर्दीतच भाजप सल्लागार मंडळ सदस्य, 'लालकृष्ण अडवाणी' यांच्या वयाशी स्पर्धा करेल (तेव्हा, अडवाणींचं वय ८८ होतं तर, आज ९८ वर्ष आहे). तेव्हा, अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या!

...आतापर्यंत प्रत्यक्षात, ''उडाला तो पक्षी आणि बुडाला तो रुपया'', अशी रुपयाची वास्तविक घसरगुंडी पहाता; ''शतायुषी भव'', असा मोदींचे खासमखास दोस्त, डोनाल्ड ट्रम्प (सध्या, ब्लादिमीर पुतीन त्यांचे दोस्त आहेत) यांनी आशिर्वाद देत, रुपयाला 'कात्रजचा घाट' दाखल्यासारखी, त्याची न थांबता 'ब्रेक फेल' घसरगुंडी सुरुच आहे.

बॉलीवूडमधील तथाकथित राष्ट्रवादी 'अंधभक्त' तारे-तारकांनी (ज्यांची, गणिती 'भक्ति व निष्ठा', ही अंतःकरणातून आलेली नसते; तर, ती धंद्याच्या गणितावर अवलंबून असते) रुपयाच्या घसरणीबाबत; तेव्हा, 'उचलली जीभ लावली टाळ्याला' या उफराट्या वृत्तीने, ''नशीब, आपले भारतीय-चलन, हे 'अंतर्वस्त्र' नाही'', असे कमरेखालचे 'राष्ट्रवादी-उद्गार' काढल्याचं चांगलंच स्मरतं...ती 'ढिंगच्यॅक' मंडळी, आता ढेंगा टाकत कुठे पसार झालीत...???

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**